शुक्रवार, १३ जानेवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१४५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 13 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-145 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

## तेव्हा गोडसेचा आवाज दाबला : संतोषी


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** माझ्या मते एखादी व्यक्ती मला आवडू शकत नाही पण मी त्याच्यासाठी लढेन, लोकशाही व्यवस्थेत ते केले जाते. गोडसेचा आवाज तेव्हा दाबला गेला असे मला वाटते. जे झाले ते लोकांनी समजून घेऊन त्यावर विचार करणे आवश्यक आहे. हा धार्मिकदृष्ट्या प्रेरित चित्रपट वाटेल पण यात जे काही सांगितले आहे ते गोडसे आणि महात्मा गांधी यांनी सांगितले आहे, असे ८० चे दशक गाजवणारे राजकुमार संतोषी म्हटले आहे.

'दामिनी', 'घातक', 'घायल', खाकी', 'अजब प्रेम की गजब कहानी' 'अंदाज अपना अपना'सारखे चित्रपट देणारे राजकुमार संतोषी सध्या चर्चेत आहेत. नुकताच त्यांच्या 'गांधी-गोडसे एक युद्ध' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाबद्दल दिग्दर्शकांनी आपली भूमिका मांडली आहे.

राजकुमार संतोषी 'गांधी-गोडसे एक युद्ध' हा चित्रपट बऱ्याच वर्षांनंतर घेऊन येत आहेत. ते पुढे म्हणाले की, आम्ही टीझर आणि ट्रेलर अशा प्रकारे कट केला आहे की लोक चित्रपटगृहांमध्ये चित्रपट पाहण्यास उत्सुक असतील. त्यांना पाहू द्या आणि मग ते सहमत आहेत की असहमत हे ठरवा. इतिहासात यापूर्वी कोणीही असा प्रयत्न केला नाही. या चित्रपटातून लोक गोडसेला ओळखतील, मी चित्रपटात कोणतीही बाजू घेतली नाही, जर मी तसे केले असते तर मी माझ्या चित्रपटाला न्याय दिला नसता, अशी त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान गांधी-गोडसे एक युद्ध' चित्रपटाची पटकथा दिग्दर्शन राजकुमार संतोषी यांचे असून ए. आर. रहमान यांनी चित्रपटाला संगीत दिले आहे. पुढच्या वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर म्हणजेच २६ जानेवारी २०२३ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. चित्रपटप्रेमी आणि राजकुमार संतोषी यांचे चाहते या चित्रपटासाठी चांगलेच उत्सुक असून नवा वाद निर्माण होण्याचीही शक्यता आहे.




## अनोखी मानवंदना



पैठण तालुक्यातील श्रीक्षेत्र चोंढाळा येथील जगदंबा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिजाऊ जयंती निमित्त 'जय जिजाऊ' नावाच्या मानवी साखळी तयार जिजाऊंना अनोखी मानवंदना दिली. जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून मुलांनी जिजाऊ वंदना घेतली. त्यानंतर मुलांनी जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर भाषण केले. यावेळी सचिव प्रशांत नरके शाळेच्या मुख्याध्यापिका मयुरी खोबरे, कल्याणी कुलकर्णी, संतोष रखे, शाहीन पठाण, वैष्णवी देशमाने, रामेश्वर काकडे, अक्षय गाभुड, ऐश्वर्या जाधव, मनीषा सोनटक्के, स्वाती नरके, नाजनीन सय्यद, भाग्यश्री हकम, किरण झुंजे, राजेंद्र वाकडे यांची उपस्थिती होती.

## अखेर मुलासाठी बापाची माघार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पदवीधर मतदारसंघाची जागा महाविकास आघाडीकडून काँग्रेसला देण्यात आली. यानंतर काँग्रेसने उमेदवार म्हणून पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विद्यमान आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या नावाची घोषणा केली. मात्र, सुधीर तांबेंनी मुलगा सत्यजीत तांबेंसाठी माघार घेतली आणि मुलाचा अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला. यानंतर सत्यजीत तांबेंनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज का भरला याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. ते गुरुवारी (१२ जानेवारी) नाशिकमध्ये माध्यमांशी बोलत होते. सत्यजीत तांबे म्हणाले, आम्ही काँग्रेस पक्षाकडे मागणी केली होती की, यावेळी मला उमेदवारी द्यावी. काँग्रेसमधील पक्षश्रेष्ठींमध्ये अनेक लोकांची मी पक्षाच्या वतीने उमेदवारी करावी अशी इच्छा होती. काँग्रेस पक्षाने मात्र निर्णय घेताना डॉ. सुधीर तांबे यांच्या उमेदवारीचा निर्णय घेतला. आज दुपारी त्यांनी हा निर्णय जाहीर केला. त्यामुळे तांत्रिक अडचणी आल्याने मला शेवटच्या क्षणाला अपक्ष म्हणून अर्ज भरावा लागला.असं असलं तरी मी अर्ज भरताना दोन अर्ज भरले आहेत. एक अर्ज काँग्रेसचा आहे आणि एक अपक्ष म्हणून अर्ज आहे. परंतु माझ्या नावाचा एबी फॉर्म वेळेवर येऊ न शकल्याने आता मला अपक्ष म्हणूनच निवडणूक लढवावी लागेल. परंतु मी काँग्रेसचाच उमेदवार आहे. मी आजपर्यंत काँग्रेसच्या विचारावर काम केले आहे, असं मत सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केले. असे असले तरी मी सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांना भेटणार आहे. मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व नेत्यांना भेटणार आहे. मी शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या सर्व नेत्यांना भेटणार आहे. मी भाजपाच्याही सर्व नेत्यांना भेटणार आहे. मी सर्वांना भेटून विनंती करणार आहे की, राजकीय पक्षांच्या पलिकडे जाऊन सर्वांनी या निवडणुकीत माझ्या पाठिशी उभे रहावे, असेही सत्यजीत तांबेंनी नमूद केले. सत्यजीत तांबे म्हणाले, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची आणि आमची यावर अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. किंबहुना काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचीच इच्छा होती की, मी निवडणूक लढवावी. परंतू तांत्रिक कारणामुळे डॉ. सुधीर तांबे यांची उमेदवारी जाहीर झाली.

## मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले भरतीचे तीळगूळ

### राज्यात 20 हजार अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या भरतीला मान्यता

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांच्या 20 हजारांपेक्षा अधिक पदांच्या भरतीला मान्यता मिळाली आहे. त्याशिवाय मानधनवाढीसह नवीन मोबाईल, विमा, अंगणवाड्यांसाठी वर्ग आदी विषयांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, एकात्मिक बालविकास सेवा आयुक्त रुबल अग्रवाल यांचेसह महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. या संदर्भातील प्रलंबित प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करुन संबंधितांना पैसे देण्यासाठी भारतीय जीवन विमा महामंडळाकडे पाठपुरावा करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिल्या. अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांच्या 20 हजार 186 पदांच्या भरतीला मान्यता मिळाली असून  ही भरती प्रक्रिया सहा महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## द्राक्षे नगरी नाशिक जिल्हा निर्यातीसाठी सज्ज

### यावर्षी अतिरिक्त २० टक्के निर्यात होण्याचा अंदाज

आधुनिक केसरी न्यूज

निफाड : नाशिक जिल्ह्यातुन द्राक्षे निर्यातीला सुरवात झाली असून यावर्षी सुमारे २० टक्के अतिरिक्त निर्यात होईल असा अंदाज आहे. नाशिक जिल्ह्यातून द्राक्ष निर्यातीला सुरुवात झाली असून मागील आठवड्यात १५ कंटेनरमधून २०० टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. त्यात १७० टन नेदरलँड, तर ३० टन लॅटव्हिया, स्वीडनला झाली आहे त्यातील एकट्या नाशिक जिल्ह्यातून ९० टक्के द्राक्षांची निर्यात झाली आहे. मागील दोन वर्षे कोरोनामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने निर्यातक्षम द्राक्षे माल पिकवला. मागील वर्षी निर्यातीबरोबरच देशांतर्गत द्राक्ष विक्रीलाही अडचण आली होती. यावर्षी मात्र शेतीमाल विक्रीला अडचण येणार नाही असा अंदाज आहे. शेतकऱ्यांनी यावर्षी निर्यातक्षम गुणवत्तेची द्राक्षे तयार केली असल्याने मोठ्या प्रमाणावर निर्यात सुरू झाली आहे. एकट्या नाशिक जिल्ह्यातुन द्राक्षे निर्यातीसाठी आतापर्यंत २४ हजार शेतकऱ्यांनी सुमारे १५४०० हेक्टरवर द्राक्षबागांची नोंदणी केली आहे. गेल्या वर्षी जिल्ह्यातून २ लाख टन द्राक्षांची निर्यात झाली होती. यंदा युरोपीय देशांची मागणी लक्षात घेता मागील वर्षापेक्षा यावर्षी किमान २० टक्के अधिक द्राक्षे निर्यात होण्याची अपेक्षा आहे. हा वेग एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत राहील. आत्तापर्यंत अवकाळी पावसाचा द्राक्षे पिकांना फटका बसला नाही परंतु वाढती थंडी, अवकाळीचे संकट आले नाही तर द्राक्षे निर्यात अधिकच वेगाने होईल असे चित्र आहे. यामुळे देशांतर्गतही द्राक्षांचे दर चढे राहतील असा अंदाज वर्तवला जात आहे.



जिल्ह्यातील हवामान द्राक्षबागांसाठी अनुकूल आहे. या हंगामाच्या सुरुवातीलाच द्राक्ष निर्यातीला सुरुवात झाली. जानेवारीच्या उत्तरार्धात द्राक्षे काढणीचा हंगाम सुरू होऊन १५ फेब्रुवारी ते १५ मार्च दरम्यान जोरात असेल. यातील सुमारे ३० टक्के द्राक्ष निर्यात फेब्रुवारी आणि मार्चमध्ये होते.


**कैलास भोसले**
**उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ**

## उगवतीचे रंग




# कवितांच्या गावा जावे...






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

**ज्यांची बाग फुलून आली त्यांनी दोन फुले द्यावीत ज्यांचे सूर जुळून आले त्यांनी दोन गाणी द्यावीत ज्यांच्या अंगणात झुकले ढग त्यांनी ओंजळपाणी द्यावे आपले श्रीमंत हृदय त्यांनी रिते करुन भरुन घ्यावे आभाळाएवढी ज्यांची उंची त्यांनी थोडे खाली यावे मातीत ज्यांचे जन्म मळले त्यांना थोडे उचलून घ्यावे.** कविता खूप साधी, सोपी आणि आशयघन आहे. या कवितेत कवी कोणी काय द्यायचं ते सांगतो. देण्यासाठी आणखी एक अट असते. देणारा उंचीवर असतो आणि घेणारा असतो खाली. त्याच्या ओंजळीत दान टाकण्यासाठी देणाऱ्यालाही थोडे खाली झुकावेच लागते. आकाशातले मेघ सुद्धा धरित्रीला न्हाऊ घालताना थोडे खाली झुकतात. बालकवी म्हणतात, ' थबथबली ओथंबून खाली आली, जलदाली मज दिसली सायंकाळी...' तसंच दत्ता हलसगीकर म्हणतात, ' आभाळाएवढी ज्यांची उंची, त्यांनी थोडे खाली यावे...' कशासाठी खाली यायचं ? तर ' मातीत ज्यांचे जन्म मळले..' त्यांना थोडं उचलून घेण्यासाठी. आपल्याला सर्वांनाच घेऊन चालायचं आहे. त्यासाठी ज्ञानेश्वर माउलींच्या शब्दांत सांगायचं तर ' वर्षत सकळमंगळी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ' भेटणं आवश्यक आहे. ती अशी आयती ' रेडिमेड ' कुठे भेटेल का ? शक्य नाही. ती सज्जनांची, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी आपणच व्हायचं आहे म्हणून तर ' भरलेल्या भीमेकडून तुकोबांची माळ ' आपल्याला घ्यायची आहे. आणखी मला आवडणाऱ्या एका सुंदर कवितेबद्दल सांगून आपण थांबू या . विदर्भातील कवी बोबडे यांची ही कविता आहे.

**देव तयास मिळो न मिळो रे ... सागर पोहत बाहू बळाने ।। नाव तयास ... मिळो न मिळो रे ॥१ ॥स्वयेच जो तेजोनिधी तरणी ॥ तदगृही दीप ... जळो न जळो रे ।।२ ॥ जो करी कर्म अहेतू निरंतर ॥ वेद तयास ... कळो न कळो रे ॥३ ॥ओळख पटली ज्यास स्वतःची ॥ देव तयास ... मिळो न मिळो रे ॥४ ॥ क्रमशः**



## आनंदी पहाट

# सकारात्मक विचारांमुळेच परिवर्तन शक्य

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, मानसिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असतं. आपण कसाविचार करतो, अनुभवतो आणि कृती करतो ? यावर ते अवलंबून असतं. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया अनावधानानं बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. यासाठीच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धार्पणापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचं असतं. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असलो, तर आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक ह्या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. मानसिक स्वास्थ्यासाठी समस्या निर्माण करणारे नकारात्मक विचार जरी ते सामान्य आहेत असं वाटत असलं तरीही सकारात्मक विचारांच्या माध्यमातून आपण निश्चितच परिवर्तन घडवून आणू शकतो. आपल्या व्यक्त होण्यातून आपलं व्यक्तिमत्वाचं वेगळेपण त्यांतच सामावलेलं असतं. आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. अनेकदा अविचारानं अथवा विचाराशिवाय कृती केल्यानं पश्चातापाची वेळ येते. ती केवळ तापदायकच नव्हे तर घातकही ठरू शकते. मनांत येणारा प्रत्येक विचार आपल्या वर्तन आणि व्यवहाराला कारणीभूत ठरत असतो. आपल्या आयुष्यांत घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा संबंध आपल्या अंतर्मनावर कोरल्या गेलेल्या विचारांशी असतो. एखाद्या व्यक्तीचे यश देखील आपल्या मनांत नकारात्मक विचार निर्माण करण्यास कारणीभूत ठरू शकते.



आधुनिक केसरी



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

**संत सेवा चित्ती | नांदो देवा ||**
**कर्मावीन नाही | सुटका देहाची ||**
**परी सत्कर्माची | साथ हवी ||१||**
**संगतीने वाढे | कर्माचे फलित ||**
**जाण सत्संगात | ब्रह्म सुख ||२||**
**ध्यानी ठेव मना | नाशाचे कारण ||**
**पापाचे पोषण | कुसंगती ||४||**
**उत्तम ते वर्म | भाव शुद्ध कर्म ||**
**जागावा स्वधर्म | अखंडीत ||४||**
**जैसी ज्याची श्रध्दा | तैसी त्याची वृत्ती ||**
**संत सेवा चित्ती | नांदो देवा ||५||**

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**स्वतःला सकारात्मक कार्यात सतत रत ठेवणे ही मानवाच्या देवत्व-प्राप्तीच्या प्रवासातील एक महत्वाची पायरी आहे.**

**फूल आणि पुस्तक यांत पुस्तक अधिक सुगंधी आहे. फुलांचा सुगंध मर्यादित आहे आणि पुस्तकांचा अमर्याद!**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**परिभू स्वयम्भू आतमा, धारक अन्त प्रकाश । प्राण प्राण जिव जीव है, परम देव परभास ।।१०५।। (स्वर्वेद पंचम मंडल अष्टम अध्याय) ०५/०८/१०५**

**मराठी अनुवाद :** तो परमप्रभू सर्व बाजूंनी सर्वाधार होऊन स्वतः आपल्या स्वयं आधारावर स्थित आहे म्हणून अंती आपला आधार आपणच असल्याने त्याला स्वयंभू म्हणतात. तो सर्व जगाचा धारक तथा प्रकाशक आहे. प्राणांमध्ये प्राणन-शक्ती देणारा तसेच सर्व जीवांचे जीवन, आत्म्याचा परम प्रकाश आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## ।। दास-वाणी ।।

आधुनिक केसरी

**जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी ।**
**जे थोराथोरासी गोवी । जाणपणें ।।**
**।। जय जय रघुवीर समर्थ ।। दासबोध : ०१/०३/२३**

आता ही शारदादेवी जी भगवान विष्णूंची माया, जिला वैष्णवी असेही नाव आहे. नाटक म्हणजे सत्याचा आभास. जे नाही ते आहे असे भासवून त्याविषयी आपुलकी, ममत्व किंवा द्वेष निर्माण करणे हे मायेचे लाघव किंवा जादूई कौशल्य. या शारदेची ताकद इतकी अफाट आहे की भल्या भल्या विद्वानांनाही जाणपण म्हणजे ज्ञानी झाल्याच्या अहंकारात गुरफटून टाकते.वास्तविक


**आम्ही झालो ऐसे म्हणे ।तो काहीच नोहे ।।**

हे ज्यांना समजत नाही त्यांना शारदा किंवा माया उमगणारच नाही. त्या सर्वशक्तिमान शारदेला माझे ग्रंथाच्या सुरूवातीलाच वंदन.

# नामाचे सूक्ष्म स्वरुप

आधुनिक केसरी

नुसते ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य ' नोकरी नोकरी ' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. ' रामनाम ' आणि ' नोकरी ' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. ' राम राम ' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ' राम राम ' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे ' नोकरी नोकरी ' असा जप करून



नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. ' राम राम ' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा ' नोकरी नोकरी ' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच ' राम राम ' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता ' राम राम ' जपावे. मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकचः प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

**आजचे बोधवचन आहे- जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.**

## हरिपाठ

आधुनिक केसरी

माऊली आपल्याला देवाच्या दारी उभे राहायला सांगत आहेत. सामान्य मनुष्य देवाच्या दारी याचा अर्थ देवळाच्या दारी असा घेत असतो. म्हणून अभंग वाचता वाचता तो मनाने देवळाच्या दारी जाऊन उभा राहतो, पुढची ओळ वाचतो आणि त्याला त्वरित देवाचे दर्शन व्हावे अशी अपेक्षा असते, बघा पटतंय का ? सर्व संतांनी सांगितले आहे की देव सर्वत्र आहे. देव नाही अशी जागाच नाही. जशी हवा नाही अशी जागा नाही, आकाश नाही अशी जागा नाही, तसे देव नाही अशी जागा नाही. थोडक्यात देव सर्वत्र आहे याचे भान ठेवणे, ते निरंतर टिकणे म्हणजे देवाच्या दारी उभे रहाणे. इथे माऊली उभे राहायला सांगत आहेत. उभा असलेला मनुष्य जागा असतो. त्याचे डोळे उघडे असतात, म्हणून तो नीट पाहू शकतो. उभा मनुष्य सतत सावध असतो. इथे समर्थांची शिकवण आठवते. "अखंड सावधान असावे | दुश्चित कदापि नसावे ||" थोडक्यात मनुष्याने अत्यंत सावध राहून सर्वत्र भरून राहिलेल्या देवाची अनुभूती घेण्याचा प्रयत्न करायला हवा.

माऊलींनी सांगितल्या प्रमाणे वागले तर त्याला त्याला चारी मुक्ती लाभतील. हे संत वचन आहे, ते सत्य असणार. मग आपल्या मनात प्रश्न होतो, आम्हाला त्याचा लाभ होणार की नाही आणि कसा होणार ? संत उत्तम शिक्षक असतात. माऊलींनी याचे उत्तर पुढील ओळीत दिले आहे. "हरीमुखे म्हणाहरीमुखे म्हणा ।पुण्याचीगणनाकोणकरी।।२।।"

# ठाकरेंकडून महाराष्ट्राची फसवणूक

## भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिंदे फडणवीस सरकारच्या नावाने बोटे मोडत सरकारला घटनाबाह्य ठरविण्याचा प्रयत्न करणाऱ्या उद्धव ठाकरे यांचे पक्षप्रमुखपदच घटनाबाह्य असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे बाळासाहेबांवर निष्ठा असलेल्या तमाम शिवसैनिकांची आणि घटनाबाह्य पदाचा फायदा घेत मुख्यमंत्रीपद पटकावून महाराष्ट्राची फसवणूक केल्याबद्दल उद्धव ठाकरे यांनी माफी मागावी व पक्षप्रमुख पदावरून पायउतार व्हावे असे आव्हान प्रदेश भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये यांनी दिले आहे. अगोदर ठाकरे यांनी घटनाबाह्य रीतीने पक्षप्रमुखपद पटकावले, आणि नंतर त्याचा फायदा घेऊन संघटनेस काखोटीला मारून मुख्यमंत्रीपदही पटकावले. सामान्य शिवसैनिकास मुख्यमंत्रीपदी बसविण्याच्या बाळासाहेबांच्या इच्छेची उद्धव ठाकरे यांनी आपल्या दुटप्पी वागणुकीतून खिल्ली उडविली आहे, असा आरोप त्यांनी केला.

'बाळासाहेब भोळे होते, मी धूर्त आहे', असे उद्धव ठाकरे यांनी एकदा अभिमानाने सांगितले होते. पदे पटकावण्याचा कट करून त्यांनी आपला



धूर्तपणा सिद्ध केला, पण सामान्य शिवसैनिकासोबत बाळासाहेबांचीही फसवणूक केली, असा आरोपही त्यांनी केला. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १९९९ मध्ये बाळासाहेब ठाकरे यांनी तयार केलेली शिवसेनेची घटना बाळासाहेबांवर केंद्रित होती. बाळासाहेब ठाकरे हयात असताना शिवसेना कार्याध्यक्ष हे पद उद्धव ठाकरे यांना देण्यात आले होते, मात्र बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर घटनेत बदल न करता शिवसेना पक्षप्रमुख हे पद तयार करण्यात आले. घटनाबाह्य पद्धतीने २०१८ मध्ये कुणालाही कल्पना न देता हे बदल करण्यात आले आणि या पदावर उद्धव ठाकरे यांची निवड करण्यात आली. त्यामुळे ठाकरे यांचे पदच बेकायदेशीर आहे. शिवसेना पक्षप्रमुख या पदाला आमचा विरोध नाही, मात्र पदावर बसल्यावर ठाकरेंनी जे बदल केले त्यावर आमचा आक्षेप आहे, असा दावा सर्वोच्च न्यायालयात करण्यात आला आहे. त्यामुळे ठाकरे यांच्या सत्तालोभाचे पितळ उघडे पडत असून आता ठाकरे पितापुत्रांनी यावर पाळलेले मौन बरेच बोलके आहे, असा टोलाही उपाध्ये यांनी मारला.

ठाकरेंचा भोंगा म्हणून महाराष्ट्रास माहीत असलेले संजय राऊत हे आता राहुल गांधींच्या पदयात्रेत सहभागी होण्याचे निमित्त साधून पळ काढू पाहात आहेत, असे ते म्हणाले. महाराष्ट्र हे असुरक्षित राज्य आहे, असे म्हणणारे संजय राऊत महाराष्ट्रद्रोही आहेत, असा आरोपही त्यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाल्यामुळे ठाकरे गटाने त्यांच्यासोबत हातमिळवणी केली आहे. भ्रष्टाचारी राष्ट्रवादी आणि घटनाबाह्य ठाकरे गट अशी युती महाराष्ट्राची जनता यापुढे सहन करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.



# 'दयानंद वाणिज्य' च्या रक्तदान शिबिरात 65 बाटल्या रक्त संकलित

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून आयोजित भालचंद्र ब्लड बँकेच्या सहयोगाने रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरात प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी अशा एकूण 65 जणांनी रक्तदान केले. राष्ट्रीय सेवा योजना आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि.12 जानेवारी 2023 रोजी हे शिबीर संपन्न झाले. या शिबिरात प्रा.डॉ. गणेश लहाने, प्रा.डॉ. प्रिया वर्मा यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक, विद्यार्थी आदी 65 जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबीराचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आरोग्य अधिकारी डॉ. योगेश गावसाने, भालचंद्र ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी दिगंबर पवार, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नितेश स्वामी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कांबळे, सुनील जहागीरदार, जयप्रकाश सूर्यवंशी, गायत्री इलवे, पूजा शिंदे, संजय ठाकूर, अन्सार शेख आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी आकांक्षा पाटील, नंदिनी पाटील यांनी तर शेवटी आभार संजय माकुडे यांनी मानले. शिबिरासाठी रासेयो सह-कार्यक्रमाधिकारी प्रा.अरुणा चौधरी, प्रा.योगेश शर्मा, प्रा.श्रावण बनसोडे, प्रा.अक्षय पवार, प्रा.लता जाधव, प्रा.दीपक सूर्यवंशी आदींसह इतर प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, आदींनी परिश्रम घेतले.

# आरटीओच्या 'वसुली'ला वैतागून युवकाचा आत्मदहनाचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** काही महिन्यांपासून आरटीओ विभागाने नियमावर बोट ठेवत धर्माबाद तालुक्यातील ऑटो व पिक अप चालकांवर कारवाईचा सपाटाच लावल्यामुळे याला वैतागून एका युवकाने आरटीओ समोरच स्वतःवर पेट्रोल टाकून घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला आहे.त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हारलं झाल्यामुळे एकच खळबळ उडाली होती.

धर्माबाद - बन्नाळी, धर्माबाद - करखेली, धर्माबाद - जारीकोट, कारेगाव,धर्माबाद - कुंडलवाडी, धर्माबाद - बामणी, धर्माबाद - 6 नायगाव (ध),धर्माबाद - बासर या मार्गावर शेकडोच्या संख्येने ऑटो चालतात.लोकांना वेळेवर शासकीय वाहतूक उपलब्ध नसल्यामुळे लोकांना ऑटोशिवाय पर्याय नाही.तसेच ग्रामीण भागातील तरुणांच्या हाताला काम नसल्यामुळे शिक्षित तरुणांनी कमी भांडवलात जुने ऑटो विकत घेऊन आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वहाचे साधन मिळविले.

दिवसाला पाचशे - सातशे रुपये कमावून हे तरुण आपले कुटुंब चालवितात. मात्र अलीकडे आरटीओची वक्रदृष्टी या व्यवसायाकडे वळली आहे.नियमावर बोट ठेवत तुटपुंज्या कमाईवर जगणाऱ्या लोकांना वीस - पंचवीस हजारांचे फाईन फाडले जात आहे.ज्याच्या महिन्याचं उत्पन्न पंचवीस हजार नाही तो व्यक्ती पंचवीस हजार दंड कुठून भरेल?

गुरुवारी फुलेनगर रोडवर एक तरुण आपल्या पिकअप मधून काही माल वाहून नेत होता.त्यास आरटीओ विभागच्या कर्मचाऱ्याने अडवून छतीस हजारांचा दंड भरण्यास सांगितले.त्या तरुणाने विनवणी करून दंडाची रक्कम कमी करण्याची विनंती केली मात्र आरटीओ विभागच्या कर्मचाऱ्याने ही वसुली लावून धरल्यामुळे तो तरुण वैतागून पेट्रोल अंगावर ओतून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.तसेच या प्रसंगाचे लोकांनी व्हिडीओ चित्रीकरण ही केले.यामुळे मात्र कर्मचार्याने हादरून जाऊन त्यास विनादंड भरता जाण्याची सूचना केली. मात्र तरुण शिक्षित असून एमपीएसीचा अभ्यास करण्यासाठी नांदेड येथेही राहिला होता. मात्र आपल्या परिस्थितीमुळे, बेरोजगारीमुळे या व्यवसायाकडे कसे वळलो याची कहाणी सांगू लागला. आरटीओने बेकायदेशीर वाहतुकीवर कारवाई करण्यावर आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु नियमांच्या अडून जी वसुली मोहीम राबविली जात आहे यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे.

वारंवार धर्माबाद तालुक्यातच येण्याचे कारण काय? धनदांडगे व्यवसायिक सोडून गरीब ऑटो, पिकअप चालकांवरच कशी कारवाई होते? ही वसुली केलेली रक्कम शासनाच्या तिजोरीत जाते की परस्पर हडुप होते?असे प्रश्न जनतेतून विचाराले जात आहेत.

# ग्रा.पं.तील गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषीवर कारवाईची मागणी : भवर

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**बालम टाकळी :** शेवगाव तालुक्याच्या मौजे सुकळी येथील स .न.२०२१ / २२ या कालावधीत ग्रामपंचायतीमधील विविध विकास कामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन दोषीं असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते व प्रहार दिव्यांग तालुकाध्यक्ष लहुराव भवर यांचे सह ग्रामस्थांनी जिल्हा परीषदेकडे निवेदनाद्वारे केली असुन कारवाई न झाल्यास २० जानेवारी रोजी रास्तारोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मौजे सुकळी येथील 2021 / 22 कालावधीत ग्रामसेवक व माजी सरपंच यांनी या दोन वर्षातील झालेल्या विविध विकास कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करून भ्रष्टाचार केला आहे. पंधराव्या वित्त आयोगाच्या आयसीआयसीआय बँकेच्या खात्यावरून विद्यमान महिला सरपंच माया लहू भवर यांना कुठल्याही प्रकारची पूर्व कल्पना न देता व विश्वासात न घेता बँकेच्या ग्रामपंचायतच्या खात्यातून 1 लाख 68 हजार O. 48 रुपये काढण्यात आलेले आहे. गावठाण हद्दीतील दलित वस्तीतील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे अपूर्ण काम ठेवून बिले काढण्यात आलेले आहे. गावठाण वस्ती मधील दलित वस्तीतील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे पूर्ण बिले काढून देखील अद्याप टाकीच्या काम अपूर्ण अवस्थेत आहे, अंगणवाडी पाणी फिल्टरचे काम अपूर्ण अवस्थेत असताना देखील त्याची पूर्ण बिल काढण्यात आलेली आहे, सार्वजनिक शौचालयाचे काम अपूर्ण असताना देखील त्याची बिले काढली, पालकमंत्रीच्या निधीतून मंजूर होऊन आलेले विविध विकास कामाचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात मंजुरीसाठी जाणीवपूर्वक दिलेले नाही, जिल्हा परिषदेच्या चालू असलेल्या वर्ग खोलीच्या तसेच पंचायत समिती शेष फंडातून कामाचे एस्टिमेटची मागणी सरपंच व ग्रामस्थांनी ग्रामसेवक यांच्याकडे वारंवार करूनही देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत असून झालेल्या विविध विकास कामातील गैरव्यवहाराची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे निवेदनावर विद्यमान सरपंच माया लहूराव भवर प्रहार दिव्यांग जिल्हाध्यक्ष लक्ष्मीताई देशमुख सह ग्रामस्थांच्या सह्या असून दोषींवर कारवाई न झाल्यास 20 जानेवारी रोजी शेवगाव , गेवराई राज्य मार्गावर सुकळी फाटा येथे रास्ता रोको करण्याचाही इशारा निवेदनातून दिला आहे.

# शिक्षक मतदारसंघासाठी 15 उमेदवारांचे 30 नामनिर्देशन अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या औरंगाबाद विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आजपर्यंत एकुण 15 उमेदवारांचे 30 नामनिर्देशन अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त जगदिश मिनीयार यांनी दिली. आजपर्यंत नामनिर्देशन अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, वंचित बहुजन आघाडी या राजकीय पक्षांचा समावेश आहे. तर उर्वरित उमेदवारांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखले केले आहेत. आज 12 जानेवारी रोजी निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार नामनिर्देशन दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. उद्या 13 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता अर्जाची छाननी होणार आहे.



**वंचित बहुजन आघाडी व शिक्षक प्रतिनिधी सभेच्या वतीने औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघ निवडणुकीसाठी आज कालिदास शामराव माने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे व हजारोंच्या संख्येने शिक्षक बांधव उपस्थित होते.**

# बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचा मार्ग मोकळा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मध्य मुंबईतील वरळी, ना. म. जोशी आणि नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासा विरोधात केलेली जनहित याचिका उच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळली. त्यामुळे बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पाला संबंधित विभागांनी दिलेल्या परवानगीला याचिकाकर्त्यांचा आक्षेप नाही, असे निरीक्षण नोंदवून प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापूरवाला आणि न्यायमूर्ती एस. जी.चपळगावकर यांच्या खंडपीठाने पुनर्विकासाला विरोध करणारी याचिका फेटाळली. न्यायालयाचा आदेश अद्याप उपलब्ध झालेला नाही. हा प्रकल्प ज्या पद्धतीने राबवण्यात येणार आहे, त्याचा विचार करता हा पुनर्विकास म्हणजे आधुनिक झोपडपट्टीच वसविण्यात येत असल्याचा आरोप या प्रकल्पाविरोधात जनहित याचिका करणाऱ्यांतर्फे युक्तिवादाच्या वेळी करण्यात आला होता.

# ‘वेड’ने लावले वेड

आधुनिक केसरी

रितेश देशमुख व जिनिलीया देशमुखच्या ‘वेड’ चित्रपटाने संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावलं. चित्रपट प्रदर्शित होऊन १० ते १२ दिवस उलटले आहेत. तरीही चित्रपटाचा बोलबाला अजूनही कायम आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. तर रितेशचा दिग्दर्शनाचा पहिलाच प्रयत्न यशस्वी ठरला. शिवाय जिनिलीयाचाही हा पहिलाच मराठी चित्रपट. तरीही तिने स्वतःला पुन्हा एकदा अभिनेत्री म्हणून सिद्ध करत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ‘वेड’ चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी २ कोटी २५ लाख रुपयांची कमाई केली होती. त्यानंतर पहिल्या आठवड्यात २०.६७ कोटींचा गल्ला जमवला. अजूनही हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक गर्दी करत आहेत. या चित्रपटाने प्रदर्शनाच्या दहाव्या दिवशी तब्बल ५.७० कोटींची कमाई केली. आतापर्यंत ‘वेड’ चित्रपटाने ३५ कोटी रुपयांपेक्षाही अधिक कमाई केली आहे. पण तुम्हाला माहित आहे का? हा चित्रपट बनवण्यासाठीही कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला. रितेशच्या या चित्रपटाचा बजेट १५ कोटी रुपये इतपत होता असे बोलले जात आहे. म्हणजेच १५ कोटी रुपयांमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई केली आहे. रितेश व जिनिलीयाच्या ‘वेड’चं बॉक्स ऑफिस कलेक्शन पाहता चित्रपटाला अधिकाधिक फायदा झाला असल्याचे दिसत आहे. शिवाय या चित्रपटाने मराठी चित्रपटसृष्टीचीही मान उंचावली आहे. अमृता खानविलकर, रवी जाधव, आदिनाथ कोठारे, क्षितीज पटवर्धन यांसारख्या कित्येक मराठी चित्रपटसृष्टीतील मंडळींनी ‘वेड’ला मिळणारा प्रतिसाद पाहून रितेश-जिनिलीयाचे कौतुक केले आहे.

# नायलॉन मांजावर बंदी हवीच

आधुनिक केसरी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

**जनतेचे सुध्दा सहकार्य आवश्यक. पोलिसांची सक्त कारवाई आणि निरअपराध लोकांचा जाणारा जीव किंवा दुर्घटना हे डोळ्यांनी दिसत असुन सुद्धा नायलॉन मांजा विक्रेता व खरेदीदारांना समज आलेला नाही ही दुर्दैवाची बाब आहे.मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाच्या विक्री व खरेदीवर बंदी आहे. तरीही नायलॉन मांजाची विक्री सर्रास सुरू असल्याचे दिसून येते. नागपूरात सर्वाधिक नायलॉन मांजाची आवक उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते. नायलॉन मांजराच्या विरोधात पोलीस कारवाई होण्याच्या अगोदर व्यापाऱ्यांनी 60 ते 70 टक्के नायलॉन मांजाची विक्री केल्याचे सांगितले जात आहे.**

त्यामुळे नायलॉन मांजाला रोखण्यासाठी सर्वसामान्यांनी पोलिसांना सहकार्य करने अत्यंत गरजेचे आहे.यावरून स्पष्ट होते की नायलॉन मांजाचा धोका अजून पर्यंत समाप्त झालेला नाही. त्यामुळे नायलॉन मांजावर बंदी असुन सुद्धा विक्री सर्रास सुरू आहे याला आपणच रोखु शकतो.नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा "बहिष्कार" सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे.कारण नायलॉन मांजाच्या विरोधात प्रशासनाने कंबर कसली आहे. त्याच धर्तीवर सर्वसामान्यांनी नायलॉन मांजाच्या विरोधात ऍक्शन मोडमध्ये येण्याची नितांत गरज आहे.संक्रांत म्हटली की पतंग आलीच पतंगी शिवाय संक्रांत अधुरी असल्याचे लहान मोठ्याना वाटत असते. परंतु काही नागरिक व मुलं यांनी जर चुकीचा मार्ग अवलंवीला किंवा निष्काळजीपणा केला तर मोठ्या प्रमाणात जिवीत हानी होते याला नाकारता येत नाही.नायलॉन मांजाच्या बंदीबद्दल गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक संघटना, संस्था व जनता आवाज उचलत आहे आणि गेल्या 10 वर्षात अनेक दुर्घटना होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत हानीसुध्दा झाल्याचे सर्वांनाच ग्यात आहे.मागील वर्षी नायलॉन मांजामुळे नागपुरमध्ये 300 हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात व पशुपक्षांच्या 600 हुन अधिक दुर्घटना झाल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे मागीलवर्षी गुजरातमध्ये पतंगबाजीमध्ये 800 हुन अधिक मानवी दुर्घटना झाल्यात यात छतावरून पडुन 100 हुन अधिक घायल झालेत व 10 जनांचा मांजाने गळा कापुन मृत्यू झाला अशा भयानक घटना नायलॉन मांजामुळे वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या आहेत.

दिनांक 5 जानेवारी 2021 ला अंगावर शहारे येणारी घटना कोराडी परीसरात घडली पतंग पकडतांना रेल्वेखाली कटुन 12 वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.म्हणजेच पतंगीच्या नादात जीवीत हाणी केव्हाही ओढावु शकते.त्यामुळे सावधगिरीचे उपाय म्हणून घरातील परिवाराने डोळ्यात तेल घालून मुलांवर करडी नजर ठेवण्याची गरज आहे. कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता "नायलॉन मांजाचा सर्वच स्तरातून बहिष्कार" होने अत्यंत आवश्यक आहे.कारण भारतात नायलॉन मांजामुळे मानवी व पशुपक्षांच्या हजारो दुर्घटना दरवर्षी होत असतात. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपला प्राणसुध्दा गमवावा लागतो.त्यामुळे मी सर्व पतंग शौकीनांना विनंती करेल की नायलॉन मांजाला "टाटा बाय बाय"करून कॉटनच्या धाग्यानेच पतंग उडविला पाहिजे.कारण अनेक पशु-पक्षांनासुध्दा नायलॉन मांजामुळे आपले प्राण गमवावे लागतात. पक्षांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती अत्यंत गंभीर, भयावह व बिकट आहे.कारण आज वाढत्या प्रदूषणामुळे त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.पक्षांना हवेत जास्त वेळ रहावे लागते. त्यामुळे त्यांना प्रदुषणाचा व आता नायलॉन मांजाचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागतो. संक्रांतीच्या शुभपर्वावर नायलॉन मांजामुळे मानवी व पक्षांची जिवीत हानी होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वसामान्यांनी स्वीकारली पाहिजे.पोलिस विभाग याबाबत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा रोज जप्त करीत आहे.नायलॉन मांजा हा मांजा नसुन "जहरीली तलवार"आहे.



कारण आपला किंवा पक्षांचा गळा "कळत न कळत" केंव्हाही कापु शकते ही बाब सर्वांनीच

लक्षात ठेवली पाहिजे. मागील वर्षी आणि आताही अनेकांचा मांजराने गळा कापल्या गेला यात ते गंभीर जख्मीसुध्दा झालेत.त्यामुळे पतंग उडविताना सावधगिरीने पतंग उडवावी.पतंग उडवा परंतु जीवाशी खेळु नका यातच सर्वांचे हित आहे. कारण एक छोटीशी चूक मोठा हादसा घडवु शकते याला नाकारता येत नाही.संक्रांतीचा आनंद भरपूर घ्या! परंतु जिवावर बितण्यालायक कोणतेही कृत्य होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.यातच सर्वांचा आनंद आहे.कायदा व पोलीस विभाग आपले काम चोख बजावीत आहे.परंतु आपणच तटस्थ रहालो तर नायलॉन मांजावर मात अवश्य करू शकतो. सध्याच्या अत्याधुनिक युगात नायलॉन मांजाची विक्री ऑनलाईनेसुध्दा होत असल्याचे प्रशासनाच्या लक्षात आले आहे त्यामुळे प्रशासन यावर योग्य कारवाई करीतच आहे.अशा कठीण परीस्थितीत नायलॉन मांजाला रोखण्यासाठी प्रशासनापेक्षा समाजाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. तेव्हाच नायलॉन मांजा हद्दपार होवु शकतो.पालकांनी आतापासूनच आपल्या मुलांना नायलॉन मांजा पासुन दुर ठेवण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करावा व नायलॉन मांजराचे दुष्परिणाम समजून सांगावे. सरकार व पोलीस विभाग यावर लक्ष ठेवुन आहे.परंतु नागरिकांचेसुध्दा कर्तव्य आहे की जी वस्तु "घातक आणि जिवघेनी"आहे आणि ती आपण रोखु शकतो ती रोखलीच पाहिजे."यामुळे अपघातावर आळा बसेल व पशुपक्षांचे प्राण वाचतील" पतंगीचा आनंद भरपूर घ्या. परंतु नायलॉन मांजाला "हद्दपार"करण्यासाठी विक्रेते,ग्राहक व नागरिकांनी पुढाकार घ्यावा.कारण नायलॉन मांजा हे आपल्यासाठी "जहरच"आहे.

नायलॉन मांजामुळे होणारे अपघात सांगुन येत नाही ते केंव्हाही कधीही होवु शकतात.आपण अनेक कठीणाईचा सामना करू शकतो मग नायलॉन मांजाला "हद्दपार"का करू शकत नाही ?मानवाने मनात ठानले तर सर्वकाही होवु शकते. सावधगिरीचे उपाय म्हणुन मी सांगू इच्छितो की मुलांनी कटलेल्या पतंगीच्या मागे धावु नये,वाहनचालकांनी कटलेल्या पतंगीच्या धाग्यापासुन सावधानी बाळगावी."सर्व अपघात टाळा व प्राणीमात्रांचे प्राण वाचवा".

# भिकेकंगाल पाकिस्तान

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

**पाकिस्तान सध्या भीषण आर्थिक संकटात सापडला आहे. पाकिस्तानात महागाई गगनाला भिडली आहे. पाकिस्तानात महागाई २५ टक्क्यांनी वाढत आहे. पाकिस्तानमध्ये जीवनावश्यक वस्तू विकत घेणे देखील मुश्किल बनले आहे. आपल्याकडे जो बिस्किटचा पुडा पाच रुपयांना मिळतो तो तिथे ५० रुपयांना मिळत आहे. खाद्यतेलाचा दर पोहचलाय ८५० रुपयांवर. पाकिस्तानमधील परिस्थिती इतकी बिकट बनली आहे की दूध, ब्रेड यासारखे पदार्थ विकत घेणे देखील सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे.**

पेट्रोल डिझेल तर केंव्हाच सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. अन्नधान्य आणि भाजीपाल्यांचे दरही गगनाला भिडले आहेत. १ किलो पीठ ४५० रुपयांना मिळत आहे ते देखील सर्वांना मिळत नाही. ज्यांचा वशीला त्यांनाच हे पीठ मिळत आहे त्यामुळे जनतेच्या संयमाचा बांध फुटत आहे. ज्या ठिकाणी पिठाच्या पिशव्या ठेवण्यात आल्या आहेत त्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त लावला आहे. या सर्व गोष्टींना पाकिस्तानमधील नागरिक कमालीचे वैतागले असून सरकार विरुद्ध रोष व्यक्त करण्यासाठी जनता रस्त्यांवर उतरत आहे. नागरिक रस्त्यांवर उतरून सरकार विरुध्द रोष व्यक्त करताना म्हणत आहेत की जर सरकार महागाई कमी करू शकत नसेल तर आम्हाला गोळ्या घालून ठार मारा. नागरिक रस्त्यांवर उतरून सरकार विरोधात घोषणाबाजी करत असल्याने सरकारची डोकेदुखी वाढत आहे. पाकिस्तानच्या शहाबाज शरीफ सरकारपुढे केवळ महागाई ही एकमेव डोकेदुखी आहे असे नाही तर त्यापेक्षा मोठी डोकेदुखी शरीफ यांच्यासमोर उभी आहे ती म्हणजे देश चालवण्यासाठी त्यांच्याकडे पैसेच शिल्लक नाहीत. पाकिस्तानच्या परकीय गंगाजळीच्या साठ्यात केवळ ४१ हजार कोटी रुपये शिल्लक आहेत. गेल्या आठ वर्षातील हा सर्वाधिक नीचांक आहे. देश चालवण्यासाठी पाकिस्तानकडे पैसाच नसल्याने पाकिस्तानकडे इतर देशांकडे भिकेचा कटोरा घेऊन जाण्यासाठी पर्याय नाही मात्र पाकिस्तानवर आज इतके कर्ज आहे की त्यांना कर्ज देण्यास कोणीही तयार नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेने पाकिस्तानला कर्ज देण्यास स्पष्ट नकार दिला आहे त्यामुळे त्यांच्या नजरा केवळ चीन आणि सौदी अरेबियावर खिळल्या आहेत. ५ जानेवारी २०२३ रोजी द गार्डीयन मध्ये लिहिलेल्या लेखात पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरीफ यांनी जगभरातील देशांना पाकिस्तानला आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे. पाकिस्तानचे एक मंत्री इशाक दर यांनी सौदी अरेबियाकडे मदतीची याचना केली आहे. सौदी अरेबियाकडून पाकिस्तानला अधिक आशा आहे कारण मागील वर्षी म्हणजे मे २०२२ मध्ये



सौदी अरेबियाने ८ अब्ज डॉलरची आर्थिक मदत केली होती. यावर्षी ही मदत दुपटीने वाढवावी अशी गळ पाकिस्तानने सौदी अरेबियाला घातली आहे. चीनकडूनही पाकिस्तनाला मदतीची अपेक्षा आहे. चीनने अद्याप मदतीची घोषणा केली नसली तरी चीन पाकिस्तनचे संबंध पाहता चीन पाकिस्तनाला आर्थिक मदत करेल मात्र ही मदत आणखी किती काळ मिळेल हा प्रश्न आहे कारण पाकिस्तान आर्थिक मदत तर घेते पण त्याची परतफेड मात्र करत नाही म्हणूनच अमेरिका, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेने त्यांना आर्थिक मदत देणे थांबवले आहे. अमेरिकेने त्यांना कर्ज देणे थांबवले असले तरी मानवतेच्या दृष्टिकोनातून पाकिस्तानला तुटपुंजी मदत केली आहे मात्र यापुढे मदत मिळणार नाही असे स्पष्ट सांगितले आहे. पाकिस्तानची परिस्थिती ही त्यांनीच ओढवून घेतली आहे. जन्मापासून हा देश दुसऱ्याच्या तुकड्यावर जगत आला आहे. इतर देशांकडून आर्थिक मदत घ्यायची आणि ती मदत पाकिस्तानच्या विकासावर खर्च करण्याऐवजी दहशतवादाला खतपाणी घालण्यासाठी खर्च करायची.

नागरिकांच्या नावाने घेतलेले पैसे पाकिस्तानने दहशतवाद्यांना दिले. दहशतवाद वाढवला त्यामुळे परदेशी कंपन्या पाकिस्तानात येत नाहीत. परकीय गुंतवणूक नाही त्यामुळे विकास नाही आणि विकास नाही म्हणून देश भकास अशी पाकिस्तानची परिस्थिती आहे मात्र पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना त्याचे काहीही सोयरसुतक असल्याचे दिसत नाही. पाकिस्तनाला आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्याऐवजी पाकिस्तानचे नेते भारतावर टीका करण्यात मश्गुल आहेत. बिलावल भुट्टो यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेली टीका यातून सिद्ध झाले आहे. अर्थात भारत पाकिस्तानच्या टीकेला भीक घालत नाही. भारतावर टीका करण्यापेक्षा पाकिस्तानच्या नेत्यांनी त्यांच्या देशातील आर्थिक परिस्थिती सुधारण्यावर भर द्यावा नाहीतर पाकिस्तान आणखी भिके कंगाल होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गणेश आत्माराम खांडेकर !




श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**वि.स.खांडेकर हे जीवनवादी लेखक म्हणून ओळखले जातात. जीवनासाठी कला हे त्यांच्या समग्र लेखनाचे सूत्र होते. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर अनेक भाषांमध्ये चित्रपट, दूरदर्शन मालिकाही निर्माण झाल्या. त्यांच्या साहित्याचे अन्य भारतीय व विदेशी भाषांत अनुवाद झाले. सन १९७४ साली ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पदवी देऊन सन्मानित केले. त्यांच्या जयंती निमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा विशेष लेख...**

वि.स.खांडेकर यांचा जन्म महाराष्ट्रातील सांगलीत झाला. त्यांच्या पूर्वायुष्यात त्यांची नाटकांमध्ये अभिनय आणि दिग्दर्शन करण्याची आवड होती. त्यांचे लेखन ध्येयवादी आहे. अंतःकरणात समाजकल्याणाची व प्रगतीची तळमळ आहे. लालित्यपूर्ण भाषा, रम्य कल्पना, कोटीबाजपणा व समाजहिताचा प्रचार ही त्यांच्या लघुकथेची वैशिष्ट्ये आहेत. कल्पनाशक्ती अतिशय तल्लख असल्याने तेजस्वी लेखनीतून मनोरंजन करण्याबरोबर समाज जीवनावर भाष्य करणे, हे त्यांच्या लेखनाचे स्वरूप होते. त्यांच्या लेखनातून माणुसकीचा गहिवर ओसंडून वाहत असल्याचे दिसून येते. त्यांच्या लेखनातून माणसावरील अपार श्रद्धा व्यक्त होते. रूपक कथा हा नवा प्रकार त्यांनी रुढ केला. त्यांनी कादंबरीसह कथा, कविता, लघुनिबंध, समीक्षा, चित्रपट-कथा, नाटक, व्यक्तिचित्रे, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांत अगदी विपुल असे लेखन केले. वृत्तपत्रीय लेखन व ग्रंथ-संपादन या क्षेत्रांतही त्यांनी ठसा उमटवला. त्यांच्या कथेत रचनाकौशल्य व तंत्रनिपुणता आढळून येत नाही, पण कथालेखनातून व्यक्त होणारे जीवनदर्शन आणि ध्येयनिष्ठा वाचकांना प्रभावित करतात, म्हणूनच तर वि.स.खांडेकर हे जीवनवादी लेखक म्हणून ओळखले जातात. जीवनासाठी कला हे त्यांच्या समग्र लेखनाचे सूत्र होते. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर अनेक भाषांमध्ये चित्रपट, दूरदर्शन मालिकाही निर्माण झाल्या. त्यांच्या साहित्याचे अन्य भारतीय व विदेशी भाषांत अनुवाद झाले. त्यांच्या उल्का या कादंबरीवर मराठी चित्रपटही काढण्यात आला आहे.



खांडेकर विष्णू सखाराम हे शब्दप्रभुत्व, कल्पनावैभव, कोटिबाजपणा, वास्तववादी, व्यामिश्र आणि प्रयोगशील लेखन करणारे साहित्यिक होते. ते महाराष्ट्रातील श्रेष्ठ कादंबरीकार व लेखक होते. खांडेकरांचा जन्म सांगली येथे दि.११ जानेवारी १८९८ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव गणेश आत्माराम खांडेकर हे होय. त्यांचे वडील आत्माराम बळवंतराव खांडेकर यांचे १९११ साली निधन झाले. त्यावेळी गणेशरावांचे वय अवघे तेरा वर्षांचे होते. त्यांच्या वडिलांचे चुलत भाऊ सखाराम रामचंद्र खांडेकर यांनी त्यांना दत्तक घेतले.

त्यानंतर गणेशराव हे विष्णू सखाराम खांडेकर या नव्या नावाने ओळखले जाऊ लागले. मॅट्रिकची परीक्षा ते आठव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. परीक्षेत चांगले यश लाभल्यामुळे त्यांच्या मामांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्यांना प्रवेश मिळवून दिला. परंतु गरीब परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण इंटरच्या वर्गातच सोडून द्यावे लागले. या काळात त्यांचा परिचय बालकवी- ठोंबरे, गणपतराव बोडस, अच्युतराव कोल्हटकर, का.र.मित्र आदी साहित्यिकांशी झाला. त्यांच्या लेखनाची सुरुवातही याच काळात झाली. 'रमणीरत्न' हे त्यांचे पहिले नाटक त्यांनी लिहून पूर्ण केले. कॉलेज सोडल्यावर ते सावंतवाडीला आपल्या बहिणीकडे राहू लागले.

सन १९१९नंतर खांडेकरांचे लेखन जोरात सुरू झाले होते. कादंबरी, काव्य, लेख, विनोदी साहित्य, असे त्यांचे साहित्य प्रसिद्ध होऊ लागले. पुढे शिरोड्याच्या ट्युटोरियल इंग्लिश स्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी स्वीकारली. पुढे ते लवकरच मुख्याध्यापक झाले. शिरोड्याचा त्यांचा काळ हा लेखक म्हणून उमेदीचा काळ होता. सन १९३८नंतर ते कोल्हापूरला जाऊन स्थायिक झाले. हृदयाची हाक, कांचनमृग, दोन ध्रुव, उल्का, दोन मने, हिरवा चाफा, रिकामा देव्हारा, पांढरे ढग, पहिले प्रेम, जळलेला मोहोर, अश्रू, ययाती, अमृतवेल, क्रौंचवध  इत्यादी त्यांच्या कादंबऱ्या. याशिवाय वायूलहरी, चांदण्या, सायंकाळ, अविनाश, मंदाकिनी असे तीस कथासंग्रह, वनभोजन, धुंधुर्मास, फुल आणि काटे, गोकर्णीची फुले, गोफ आणि गोफण हे लेख. आगरकर व गडकरी यांचे चरित्र आणि वाङ्मयाचे संग्रह प्रकाशित झाले. ज्वाला, देवता, सुखाचा शोध, माझं बाळ, लग्नं पहावं करून, सरकारी पाहुणा या चित्रपटांच्या कथा, संवाद आणि गीते त्यांनी लिहिली होती. त्यांचे विनोदी वाङ्मय वैशिष्ट्यपूर्ण होते. तर रुपक कथा ही खांडेकरांनी मराठी कथेला दिलेली देणगी आहे. अशा या प्रतिभासंपन्न ज्येष्ठ साहित्यिकाचे दि.२ सप्टेंबर १९७६ रोजी निधन झाले.

!! जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

# विद्याताई आणि...



संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

आधुनिक केसरी

**माणसाचे समृद्ध जगणे कशाला म्हणावे याचा शोध घेणाऱ्यांची संख्या आजच्या जगात वाढते आहे ही चांगली गोष्ट आहे. मात्र भौतिक व शहरी समृद्धीच्या माऱ्यात तीच खरी समृद्धी असे अनेकांना वाटू शकते. हा संभ्रम दूर करण्यासाठी विद्यार्ताईंच्या प्रवासाकडे पाहिले पाहिजे. आयुष्यात छोटे-मोठे नकार प्रत्येक माणसाला मिळत असतात. विद्यार्ताईंनी त्यांना मिळालेल्या नकाराकडे उद्या अधिक चांगलं करण्याची संधी या दृष्टिकोनातून बघितले. सकारात्मक आशावाद हा विद्याताईंच्या स्वभावाचा भाग आहे. विद्याताईंना माणसांमध्ये खूप स्वारस्य आहे. त्यामुळे त्यांचा गोतावळा खूप मोठा आहे. त्या नेहमी म्हणत, मी पैशाने श्रीमंत नाही पण माणसाने दिलेल्या प्रेमाची संपत्ती माझ्याकडे खूप आहे.**

विद्याताईंनी पस्तीशीपर्यंतचे आयुष्य समोर येईल तसेच स्विकारले. स्त्री मासिकामध्ये, स्त्री सखी मंडळामध्ये काम करताना त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होत गेले. त्यांनी कमलाकी; हे त्यांची आत्या डॉ.कमलाबाई देशपांडे यांचे चरित्रात्मक पुस्तक लिहिले. शैला बापट ही त्यांची त्या काळातली मैत्रीण होती. तिच्याबरोबरच्या मैत्रीतून त्यांना नवे विचार मिळत होते. कमलाकी वाचल्यानंतर शैलानी विद्याताईंना सांगितलं तुमच्या लेखनात खूप पुढचा विचार आहे पण तो तुमच्या वागण्यात दिसत नाही. मग त्यांनी आपल्या विचारात आणि कृतीत कमीत कमी अंतर असावे असा प्रयत्न सुरू केला. त्यातून त्या अधिक खंबीर झाल्या. माणूसकी जपण्याचा त्यांनी नेहमी प्रयत्न केला. आपल्याला स्वतंत्र मत प्राप्त झालं की घरी बिनसायला सुरुवात होते याचा अनुभव त्यांना आला. त्यांनी घरच्यांशी चर्चा करून विचारपूर्वक घर सोडले. विद्यार्ताईंना आपल्या मर्यादाची जाणीव होती. आपण खूप काही केल्याचा त्या दावा करत नाहीत. पण जे मला समजलं ते इतरांना सांगितलं पाहिजे असं त्यांना वाटतं. स्वतःच्या प्रश्नांना भिडणं, विचारांच्या व विवेकाच्या कसावर स्वतःला तपासून कृती करणे, एका मागून एक काम करणं असं सतत चालू असतं. या सगळ्या प्रवासात त्यानी स्वतःच्या आयुष्यात बदल घडवले व इतरांनाही प्रेरणा दिली. इतरांनाही माणूस म्हणून स्वतंत्र आणि समृद्ध जीवन जगण्यास प्रोत्साहन दिले. स्त्री मासिका मध्ये काम करताना त्यांच्या लक्षात आल की आपण नुसता विचार करून उपयोग नाही तर त्यासाठी आपण सक्रिय झाले पाहिजे. नुसते छापील शब्द उपयोगाचे नाहीत.  क्रमशीलता हवी. या विचारातून नारी मंचाची स्थापना झाली. त्यादरम्यान स्त्री मासिकाचे व्यवस्थापन बदलले. नवीन व्यवस्थापनाशी जुळवून घेता येईल असं न वाटल्याने विद्यार्ताईंनी नोकरीचा राजीनामा दिला. नोकरीचा राजीनामा आणि घर सोडण्याचा निर्णय हे विद्यार्ताईंनी दिलेले नकार होते. आई-वडिलांच्या मालमत्तेतला विद्याताईंच्या वाट्याचा भाग म्हणून त्यांना प्रभात रोडवरील एक फ्लॅट मिळाला. मिळून साऱ्या जणींचेचे ऑफिसही तेथेच आहे. नवीन मासिक काढायचा ठरवलं. त्याचं सुरुवातीचे भांडवल म्हणजे विद्याताईंचे विचार. नंतर देणग्या गोळा केल्या. प्रत्येक वर्षी यापुढे मासिक चालेल की नाही हा प्रश्न घेऊनच वाटचाल केली. विद्याताईंना पत्रकारितेचा अनुभव होता. अनुभवातून त्या बदलत गेल्या. त्यांचे अनुभव सर्वांपर्यंत पोचावे आणि स्त्रियांनी योग्य वेळी स्वतःकडे पाहायला, विचार करायला शिकाव. स्त्रियांना बोलण्यासाठी अनुभवाची देवघेव करण्यासाठी व्यासपीठ असावं असं विद्याताईंना वाटलं. विद्याताई म्हणतात, स्त्रियांचे प्रश्न हा माझ्या विचारातील सर्वाधिक काळजीचा बिंदू आहे. पत्रकारिता व कृती यांची घट्ट वीण विणण्याचा माझा प्रयत्न आहे. विचार करायला लागल्यावर मला कृती करायचं बळ आल. स्वतःपासून सर्वांपर्यंत पोहोचण्याचे जीवन सुत्र; मिळून साऱ्याजणी; व नारी समता मंच; या दोन्ही माध्यमात मला सापडल आहे. अनेक चढ उतार पार केल्यावर मला माझा आत्मसन्मान, आत्मविश्वास व खूप शांती लाभली आहे. म्हणूनच मी कामात आनंदाने जगते आहे. समृद्ध जीवनाच्या विचारात लग्न संस्था हा महत्त्वाचा टप्पा आहे. उच्च शिक्षण घेतलेले तरुण लग्नाला सामोरे जाताना आज ताणतणावातून जातात. लग्न या विषयी खुल्या वातावरणाची आणि चर्चेची गरज आहे. मात्र आजच्या जगण्याच्या शर्यतीत हा खुलेपणा किती टिकेल हे सांगणे अवघड आहे. त्यांनी साथ साथ विवाह मंडळाची स्थापना केली. पण दुर्दैवाने तरुण मुलं,मुलींना या विषयाचे विशेष महत्त्व पटलेलं नाही. त्यामुळे सभासद मुला मुलींची संख्या खूप कमी आहे. लग्न आपण महत्त्वाचं मानतो. पण लग्नाविषयीचा किंवा त्यानंतरच्या सहजीवनचा विचार महत्त्वाचा मानत नाही. त्यामुळे लग्नाच्या बाह्य गोष्टींचा जास्त विचार केला जातो. पात्रिका, जात, पोटजात, पैसा, स्टेटस्, घरदार, सौंदर्य, शिक्षण, स्मार्टनेस या गोष्टींकडे लक्ष दिले जाते. पण आवडीनिवडी, छंद, एकमेकांना समजून घेणं, जाणून घेणं, समजूतदारपणा, सामाजिक कामात रस, आवडीनिवडी, आपल्याला नक्की काय हव आहे? काय थोडं नसलं तरी चालेल याविषयीची समज, याचा काहीही विचार मुलांनी केलेला नसतो. साथ साथमध्ये मुलांनी भरण्यासाठी जो फॉर्म आहे तो खूप व्यापक आहे. त्यामुळे मुलांना स्वतःला समजून घेण्यासही मदत होते. आपल्या नेमक्या गरजा काय आहेत, काय तडजोडी करण्याची आपली तयारी आहे, लग्न ठरवताना कुठल्या गोष्टीला महत्त्व द्यायला पाहिजे, कुठल्या गोष्टीवर ठाम राहिल पाहिजे, कुठल्या गोष्टी नक्की पाहिजेत या गोष्टी बोलण्याचं व इतर विषयांना वाट मोकळी करून देण्याचं काम साथ साथ मध्ये होतं. नवरा, बायकोला मित्र-मैत्रिणी असले पाहिजेत. स्त्री-पुरुषांच्या मैत्रीकडे निकोप दृष्टीने पाहायला हवं. विकसित होण ही आयुष्यातील महत्त्वाची गोष्ट आहे. आपण माणूस आहोत तर आपण वाढत राहिले पाहिजे दोघांचं वाढणं एकाच दिशेने होईल असं नाही पण वाढत राहणं महत्त्वाचं. विद्याताईंचे विचार अनुभवातून शिकत परिपक्व होत गेले.



त्यांची लेखन शैली प्रसन्न, सुलभ आणि कणखर आहे. या पुस्तकातून अंजली मुळे व आशा साठे यांनी विद्याताईंचा गृहिणी ते विचार संपन्न  कार्यकर्ती हा प्रवास उलगडून दाखवला आहे. त्या दोघींचे मनोगत व यमाजी पालकर यांची प्रस्तावना वाचनीय आहे. विद्याताईंनी सांगलीच्या लिमये यांचं; सन्मानाने मरण्याचा हक्क; हे पुस्तक वाचले. त्यांची लिमयांशी ओळख झाली. आणि स्वेच्छामरणाचा विचार त्यांना महत्त्वाचा वाटायला लागला. त्यांनी  जेन्स वे लेट मी डाय बिफोर आय वेक, एक्झीट हाऊस अशी पुस्तके वाचली.

आणि स्वेच्छामरणाचा विचार त्यांना महत्त्वाचा वाटायला लागला.स्वेच्छामरण म्हणजे ती व्यक्ती स्वतःच स्वतःच्या मरणाचा विचार करते. त्या म्हणतात, स्वेच्छा मरणाचा विचार हा सन्मानपूर्वक जगण्याचा विचार आहे. तुमची जगण्याची जी प्रतिष्ठा आहे ती तुमच्या मृत्यू समयी सुद्धा राखण्याचा विचार आहे. तुम्हाला लेचपेच, बावळ, पराधीन, अपमानित, पिडीदायक, केविलवाण्या अशा अवस्थेत जगण्यापेक्षा छान मरण आलं पाहिजे. स्वेच्छामरणाचा कायदा झाला पाहिजे. मरणासाठी डेथ पील असायला हवी. डेथ पील कडून माझ्या तीनच अपेक्षा आहेत मृत्यूची निश्चिती, कमी वेळ आणि वेदनारहितता. विद्याताईंबरोबरच्या संवादातून उलगडलेला त्यांचा गृहिणी ते विचार संपन्न कार्यकर्ती हा प्रवास अतिशय प्रेरणादायी आहे. त्यांचा प्रवास समजून घेताना आपण आपल्या आयुष्यात कसे वागलो याचा शोध सुरूहोतो. त्यावरून बोध घेऊन आपल्या वर्तमानात आवश्यकते नुसार बदल करून आपले भविष्य अधिक समृद्ध करू शकतो.

# आई कोठे गेली तू...

आधुनिक केसरी

***(मागील अंकावरून)*** आमच्या सोबत.....तुझे अस्तित्व आमच्या साठी किती महत्त्वाचे होते.....किती ताठ मानेने सांगायचे ग माझे आई वडील दोघे ही आमच्या सोबत आहेत....किती सार्थ अभिमान होता? कारण तो मायेचा आधार,हात आमच्या सोबत होता ना.....किती अभागी आहोत आम्ही? तेज,साक्षीला आजी-बाबा म्हणून तुम्ही जे प्रेम दिले ते किती अनमोल आहे...त्यांना,त्याच्या गावाकडील आजी बाबांचे थोडे ही प्रेम लाभले नाही......मुले बापाविना कशी वाढवली?तुमची साथ होती म्हणून मी जगले....अन् मुले ही... हे तुला चांगले ठाव होते ना? जाणून होती ना?        ही अजब दुनिया आहे ....जे सर्वांना आवडतात त्यांनाच देव घेवून जातो.....शाळा सुटल्यावर रोज घरी आल्यावर तुझी आठवण येते.... तुझा उच्चारही न करता आण्णाशी कशी बोलते फोनवर ते ही समजत नाही...नित्य वाटते तू आहे जवळच आण्णा म्हणतील बोल तुझ्या मम्मीशी.......तुझे माझ्या स्वप्नात येणे.....पण ते प्रत्यक्षात माझ्या सोबत असणे किती चांगले झाले असते..... तू माझ्या स्वप्नात किती छान व्हाइट प्रिंटेड वन पिस घालून डान्स केला ग?....नंतरही किती छान साडी घालून तयार होवून बसली होती माझ्याही आधी... शिवानी ला छान समजावत होती...स्वाती चे किती मोठे घर होते.. किती छान आनंद साजरा करत होतो....मम्मी,खर सांग ना तू, मला का सोडून गेलीस?मी तुझी लेक च ना.....मला तुला खूप भेटावे वाटते... तुझ्या मांडीवर डोके ठेवून रडावे वाटते....आतून मी आता पूर्ण तुटले आहे? तुझी माया - छाया मला अजून १०-१२ वर्षे तरी द्यायची होती ना...तो पर्यंत मी ही माझ्या प्रापंचिक जबाबदाऱ्यातून मुक्त झालेच असते...२०३७ ला तर पूर्ण फ्रीच झाले असते.....निवांत कोठे तरी राहिलो असतो.....    निवांत कोठे तरी राहिलो असतो..... गप्पा-टप्पा.....मस्ती करत बसलो असतो.....तुला मला वेळच देता आला नाही ग? मुले लहान होती तेव्हा खूप वेळ देत होते तुला,आण्णा ना....अन् जशी मुले मोठी झाली तशी मी खूप स्वार्थी झाली ग.....अन् तुझ्या प्रेमाला मुकले......माझ्या मुलांसाठी मला लगेच पुण्याला यावे लागत.तू नित्य आम्हा सर्वांना समजून घेत होती......स्वतः साठी तू जगली च नाही ग.आधी सासू - सासरे,आज सासू,नंदा,दिर अन् नंतर आम्ही चौघे,त्या पाठोपाठ आमची मुले....तुलाच तुला वेळ देता आला नाही....आण्णांनी नंतर का होईना तुझ्या सर्व हौशी पूर्ण केल्या?मी नित्य म्हणायची मम्मी तू खूप लकी आहेस.किती छान स्माईल द्यायची....तुझे नाजूक ,गुलाबी ओठ तर मला प्रचंड आवडायचे?तुला कधी पावडर लावायची गरज पडली नाही?एकदा टिकली लावली तर एक टिकली तुला महिना महिना जायची? बळजबरी तुला केसांना मेहंदी लावत असे मी?मे मध्ये व दिवाळी मध्ये....कोणतीही साडी तुझ्या अंगावर उठून दिसत......   नित्य आमच्यासाठीच तुझे जगणे झाले ग ......मम्मी,ये ना परतुनी....थोडे तुझ्या साठी ही तू जगायचे राहून च गेले? थोडा तरी वेळ तुला तू द्यायचा होता ना? अग,१३/१२/२२ ला ही मला नीट झोप आली च नाही....रात्रभर बेचैन होत होते.. पहाटे ची भीती च वाटते.... काय होत होते ते ही समजत नव्हते....सकाळी जेव्हा भाऊ ने फोन केला तेव्हा माझी शाळेत जायचीच तयारी चालू होती. भाऊ चा फोन आला तेव्हा तो बोलला मम्मी ला दवाखान्यात न्यायचे .तू लवकर ये मुलांना घेवून....मी ब्रश करून,अंघोळ करून,४ चपात्या करून चहाही केला.....मला ही तुझ्यासारखी सारखी च भूक लागते....भूक लागली की खायला एक शेंगदाणा असला तरी खूप होतो ना.....तेजा ला तर बळजबरी तयार केले.....आजीला तू व साक्षी भेट,मला आजी जवळ सोडून तुम्ही काकांसोबत परत पुण्याला या..... मला व तुम्हाला भेटल्यावर आजीला बरे वाटेल,ती लगेच बरी होईल.अन् तिला मग आपण लगेच पुण्याला घेवूनच येवू....पण,काय पहायला भेटले  त्या नंतर ही मी झोपले नाही कशाची शिक्षा आम्हाला अशी देवाने दिली..ज्यांना मरण हवे त्यांना देव का मरण देत नाही...अन् ज्यांची गरज असते त्यांनाच का घेवून जातो?? काय मिळते त्याला इतके निष्ठुर वागून?२५/१२/२२ ला रात्र भर मी झोपले नाही.....खूप भीती वाटत होती....शेजारी छाया,स्वाती दोघी होत्या झोपायला... एक मिनिट ही डोळे बंद करू शकले नाही.....१०-१२ वर्षांनी नंतर आपण  सोबतच गेलो असतो....माझ्या ज्या जबाबदाऱ्या त्या तूझ्या ही होत्याच ना? तुमच्या दोघांच्या भरवशावर मी जीवन जगत होते...हे तुला ही माहिती होते ना?हक्काचा आधार होती ना? तो पदर कोठून आणू? रक्ताचे नातेच महत्त्वाचे असते.....मानलेल्या नात्याला काही अर्थ नसतो ग? मी ही काहीना आई,बाबा/गुरू मानने होते? त्या नात्याने खूप त्रास झाला....आई लेकिशी असे वागू शकेल असे वाटले ही नाही ग? तुम्हीच माझे दैवत होते,असणार,अन् ते मी जपणार? अरुण चे आई बाप ही पाहिले..तो गेल्यावर त्यांनी माझ्या मुलांकडे डोकावून ही पाहिले नाही....थोडे ही प्रेम दिले नाही..... की कधी हक्काने त्यांच्या सोबत फिरवले नाही.....की कोठे त्यांना प्रेमाने घेवून गेले नाही ? की कधी त्यांच्या वाढदिवसाला फोन केला ? अरुण असता तर असे चित्र नसते ग? मी का फक्त आठवणींवर च जगायचे का?सगळ्या आठवणीच......माझ्या काळजाचे तुकडे तुम्ही दोघांनी किती प्रेमाने सांभाळले,जपले,वाढवले? ते प्रेम मला,व त्यांना परत आता मिळेल का? मनात विचारांचा इतका काहूर माजला? डोके  खूप जाम होते? माझी मुले कधी नोकरीला लागतील..त्यांची कधी लग्न होतील?ती सुखी झालेली मला फक्त पहायचे? ...ते डोळे भरून पाहण्यासाठी माझ्या हातात मला तुमचा हात हवा होता ना?...ये ना परतुनी...आण्णा ना ही तुझा च आधार होता ना?...ते ही तुझ्या च जवळ सर्व बोलून दाखवत ना? ..तुझ्या वर  ते आतोनात प्रेम करत होते,आहे अन् असणार? तुझ्या विना ते किती एकटे असतील ते माझ्या शिवाय कोणी समजूच शकणार नाही? अशी अर्धवट साथ सोडून तू जायचेच नव्हते? खूप चुकली तू?....जे कोणी आले घ्यायला त्यांना सांगायचे होते ना नंतर या..... इतकी घाई कशाला करतात.....मला अजून जगायचे??ये ना ग परतून?? त्या विध्यात्याने मला कायम दुःख च दिले....आता ते सहन करण्याची क्षमता नाही माझ्यात....मम्मी तू तरी मला समजून घेशील.... **समाप्त**

# कुंजविहारी यांची भेटेन नऊ महिन्यांनी कवितेच्या निर्मितीचे संदर्भ

आधुनिक केसरी



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

**भेटेन नऊ महिन्यांनी ही कविता ऐकली म्हणजे आपण सरळ सरळ शहीद ए आजम भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांची आठवण करून साधारणपणे त्या तिघांना त्यातही भगतसिंगांना भेटायला त्यांची आई आली असेल आणि आपला मुलगा फाशी जाणार म्हणून रडत असेल त्यावेळी ह्या धीरोदत्त वीराने आपल्या आईची समजूत काढत आपण मातृभूमीच्या सेवेसाठी पुन्हा नऊ महिन्यांनी जन्म घेणार आहोत असे उद्गार काढले असावे असा विचार करत असतो. मात्र ही कविता भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी होण्या अगोदर लिहिली गेली होती इतकेच नव्हे तर तिघांच्या फाशी पूर्वीच सोलापूर चे चार शहीद वीर देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला म्हणून फाशी जाताना ही कविता गात गात फाशी गेले असे सांगितले तर... कदाचित आपला यावर चटकन विश्वास बसणार नाही पण हे आणि हेच सत्य आहे. काही कविता खरोखरच काळाच्या छाताडावर अजरामर झाल्या आहेत त्यापैकीच एक म्हणजे भेटेन नऊ महिन्यांनी ही कुंजबिहारी यांची कविता होय. आता कुंजविहारी ह्यांच्या मनात भेटेन नऊ महिन्यांनी ही कविता कशी निर्माण झाली हे पाहताना आपल्याला भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील काही घटनांची माहिती असणे आवश्यक ठरते.**

भारतामध्ये असहकार आंदोलन सुरू असताना गोरखपूर जिल्ह्यात 4 फेब्रुवारी 1922 रोजी चौरीचौरा या ठिकाणी स्वातंत्र्यासाठी आंदोलकांनी आंदोलन करताना एका पोलिस चौकीला आग लावली आणि त्या आगीत 22 पोलीस ( इंग्रज सरकारचे ) जळून मृत्युमुखी पडले. महात्मा गांधींना हिंसा आवडली नाही आणि त्यांनी संपूर्ण असहकार चळवळ थांबविली. हे आपल्या सर्वांना माहिती असतं मात्र त्यानंतर इंग्रज सरकारने चौरीचौरा प्रकरणांमध्ये जवळपास 228 लोकांना तुरुंगात डांबले, त्या पैकी दोन जण तुरूंगातच मरण पावले एकजण माफीचा साक्षीदार झाला आणि 172 जणांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली त्यावेळी पंडित मदन मोहन मालवीय यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयामध्ये या निकालाविरुद्ध अपील केली आणि भारतीय स्वातंत्र्य सैनिकांच्या वतीने खटला लढला. त्यावेळी शेवटी 19 जणांना फाशीची शिक्षा कायम करण्यात आली. 2 जुलै 1923 ते 11 जुलै 1923 ह्या कालावधीमध्ये 19 जणांना फाशी देण्यात आली. फासावर जाणार यांची नावे विक्रम, दुदही, भगवान, अब्दुल्ला, काली चरण, लाल मुहम्मद, लौटी, मादेव, मेघू अली, नजर अली, रघुवीर, रामलगन, रामरूप, रूदाली, सहदेव, मोहन, संपत, श्याम सुंदर आणि सीताराम अशी होती. या घटनेचे तीव्र पडसाद भारत भर पडत होत. सशस्त्र क्रांती शिवाय पर्याय नाही ह्या विचारावर भारतातील युवक पोहोचला होता. क्रांतीचा मार्ग हाच स्वातंत्र्याचा मार्ग असा विश्वास दृढ झाला होता. युवक वर्ग क्रांतिकारकांच्या लढयात सामील होऊ लागला होता. साहित्यिक आणि कवी हे सुद्धा राष्ट्रीयत्वाची भावना लोकांमध्ये जागृत करण्यासाठी देशभक्तीपर गीत आणि काव्यलेखन करू लागले होते. महाभारतातील युद्ध किंवा भारतीय पौराणिक कथा आणि इतर परकियांची शक्तींची आक्रमणे यांचा सहसंबंध इंग्रजांविरूद्धच्या स्वातंत्र्य लढ्याशी जोंडणारी कविता त्या काळात लिहीली गेली. त्यात एक महत्वाचे कवी होते 'कुंजविहारी' मला कुंजविहारी आणि अश्फाकउल्ला खान ह्यांच्यात एक साम्य आढळते ते म्हणजे हे दोघेही देशभक्तीपर काव्य करणारे कवी होते आणि ह्या दोघांनीही प्रत्यक्ष स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता. कवी कुंजविहारी यांचे संपूर्ण नाव हरिहर गुरुनाथ कुलकर्णी-सलगरकर ह्यांचा जन्म 10 नोव्हेंबर 1896 रोजी झाला. सोलापूर ही त्यांची कर्मभूमी होती. स्वातंत्र्यलढ्यात अतिशय सक्रिय असलेले कुंजविहारी ह्यांनी शिवरायांची आरती आणि इतर देशभक्तीपर रचना तर केलेल्याचं आहेत मात्र चौराचोरी प्रकरणात ज्या 19 लोकांना फाशी झाली त्यातील कुणी एक क्रांतिकारक फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी होण्यापूर्वी तुरुंगात भेटायला आलेल्या आईला "आई तू रडू नकोस मी नऊ महिन्यांनी पुन्हा जन्म घेऊन येणार आहे" अश्या शब्दात बोलला आणि ते वाक्य कुंजविहारी ह्यांच्या मनात एक अजरामर काव्यबीज पेरून गेलं. भेटेन नऊ महिन्यांनी या तीन शब्दांनी मनाची पकड घेतलेली असतानाच कुंजबिहारी यांना खुदीराम बोस या अठरा वर्षीय तरुणाने देशासाठी फासावर जाताना मनामध्ये कोणते विचार केले असतील असा विचार करून बंगाली भाषा मध्ये प्रचंड गाजलेली एक कविता हाका मारत होती असे म्हणावे लागेल. ते गीत होते ***'एँक बार बिदाय दे मा'.***

हसत हसत देशासाठी शहीद होणारा क्रांतिकारी तरुण खुदिराम बोस आपल्या आईला म्हणजे मातृभूमीला म्हणतो आई एक वेळेस पाठवणी कर मी पुन्हा येईल.... 'एँक बार बिदाय दे माऽ' हे गीत लोकगीतकार व क्रांतिकवी नझरुल इस्लाम यांनी लिहिले होते. देशाच्या फाळणीनंतर पुढे त्यांना बांगलादेशच्या राष्ट्रीय कवी चा मान मिळाला होता. नझरुल हे स्वतः 'सेनापती' होते व युद्ध लढण्याचा अनुभव असलेले पहिलेच क्रांतिकवी असावेत आपल्या कवितेमध्ये ते म्हणतात

***एँक बार बिदाय दे माऽ, घुरे आशी!***
***आमि हाशी हाशी पोरबो फाशी देखबे भारतबाशी***
***कोलेर बोमा तैरी करे दांडियेछिलाम रास्तार धारे***
***बडो लाटके मारते गिये, मारलाम आर एक इंग्लंडबाशी***
***हाते दिये थाकतो छोरा, तोर खुदी कि पडतो धरा माऽगो रक्त***
***माश एक करिताम, देखतो जगत बाशी शनिबार बेला दाष्टार***
***पोरे जोर्जकटेते लोक ना धारे माऽगो होलो अभिरामेर द्वीप***
***चालान मा खुदिरामेर फाशी बारा लाख तेत्रीश कोटी रोईलो***
***मा तोर बेटाबेटी माऽगो तादेर निये घर करिश माऽ बऊदेर***
***करिश दाशी दशमाश दशदिन पोरे जन्म नेबे माशिर घरे माऽगो***
***ओ माऽ तॉखन जदि ना चिनते पारिश देखबे गोलाय फाशी***
***'तॉखन जदि ना चिनते पारिश...' 'देखबे गोलाय फाशी'....***

नझरूल इस्लाम यांनी खुदीराम बोस यांनी आपण देशसेवेसाठी आपल्या मावशीच्या पोटी पुन्हा जन्म घेऊ आणि या जन्मात अधुरी राहिली देशसेवा नव्याने करू, तसेच आपल्याला ओळखण्यासाठी ज्या बालकाच्या गळ्यावर फाशीच्या दोरीचे निशाणी असेल तो मी असेल अशी जन्मखूण सांगून ठेवली. उदात्त देशभक्त खुदीराम बोस यांचे हौतात्म्य, नझरूल इस्लाम यांचे कवित्त्व आणि स्वतः देशभक्त असलेल्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी असलेल्या कुंजबिहारी यांनी चौरीचौरा ह्या आंदोलनात फाशी गेलेल्या शहीदांच्या साठी नझरूल इस्लाम त्यांच्या कवितेला समांतर अशी एक कविता लिहिली ती म्हणजे भेटेन नऊ महिन्यांनी...



त्या कवितेत कुंजबिहारी लिहितात,

***मनी धीर धरी शोक आवरी, जननी !***
***भेटेन नऊ महिन्यांनी !***

मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आज शहीद होत असतो तरी माझी मातृभूमी पारतंत्र्यात आहे याचे मला दुःख आहे. त्यामुळे माझ्या जाण्याचे दुःख मनामध्येच धरू नकोस, मी नऊ महिने नऊ दिवसांनी पुन्हा जन्म घेणार आहे. असे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याप्रमाणे आपल्यासारखे अनेक वीर हुतात्मे झाले आहेत त्यामुळे माझ्या एकट्याच्या मरण्याचे दुःख मानू नकोस. मला वीर मरण लाभले आहे आणि त्याला देशासाठी वीर मरण लागते तो वैकुंठास म्हणजे स्वर्गात जातो. मी वैकुंठात गेल्यानंतर देवाला हेच मागणे मागेन की मला माझ्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी, मातृभुमीच्या उद्धारार्थ पुन्हा तुझ्या पोटी जन्म दे. ही समर्पित भावना कुंजबिहारी यांनी आपल्या काव्यातून महाराष्ट्रातील क्रांतिकारकांना स्फूर्ती देण्याचे साठी लिहिली असे म्हणावे लागते. भेटेन नऊ महिन्यांनी ही कविता तेरा कडव्याची दीर्घ कविता होती. ह्या कवितेला असलेला आणखी एक महत्त्वाचा संदर्भ आहे. खरे म्हणजे त्या संदर्भाशिवाय कुंजविहारी ह्यांच्या ह्याकाव्या स पूर्णत्वाच येत नाही असे मला वाटते. तो संदर्भ म्हणजे , 12 मे 1930 च्या रात्री सोलापुरात "मार्शल लॉ' पुकारण्यात आला होता. ह्यात ज्या चार स्वातंत्र्या सैनिकांना पकडल्या गेले ते होते, मल्लप्पा रेवणसिद्धप्पा धनशेट्टी हे त्यातील एक प्रमुख स्वातंत्र्यवीर होते. सोलापूर शहरात शहरवासी त्यांना सार्वजनिक काका असे म्हणत यावरून त्याचा गावातील लौकिक लक्षात घेता येईल. अवघे 33 वर्ष वयाचा हा तरुण सविनय कायदेभंगाच्या चळवळीत अनेक वेळा सभांचे अध्यक्ष आणि बहुतांश वेळी प्रमुख वक्ते म्हणून भाषण करत असे. खरे म्हणजे सोलापूरमधील कोणताही सिद्धरामेश्वराच्या यात्रेमधील नंदीध्वज वाहकाचे काम करत असलेल्या मल्लपा ह्यांनी भडकलेल्या जमावाला शांत करत कलेक्टरचा जीव वाचविला होता मात्र कलेक्टर ने जाता जाता गोळीबार करायला लावला त्यामुळे चिडलेल्या जमावाने हाती आलेल्या दोन पोलिसांना पेटवून दिले होते त्याच जमावाला भडकविणे आणि पोलिसांच्या खुनाच्या आरोपाखाली मल्लपा सह किसन लक्ष्मीनारायण सारडा ह्या सार्वजनिक उपक्रमांत सातत्याने सहभागी असणाऱ्या आणि मल्लप्पा धनशेट्टी यांचे जीवलग स्नेही असलेले व्यापारी यांना ते 8 मे च्या सकाळी निघालेल्या मिरवणुकीत सहभागी असल्याने आरोपी केले गेले होते. त्याशिवाय जगन्नाथ भगवान शिंदे आणि अब्दुल रसूल कुर्बान हुसेन ह्या शायर असलेल्या तरुण संपादक देशभक्तास आरोपी केले होते. मल्लपा धनशेट्टी ह्यांची पत्नी त्यावेळी गर्भवती होती. असे म्हणतात इंग्रज सरकारने सोलापूरच्या चारही जणांना फाशी देण्यासाठी 12 जानेवारीचा दिवस जाणीवपूर्वक निवडला. कारण 12 जानेवारी 1931 रोजी सोमवारी सोलापूरच्या सिध्देश्वर यात्रेचा हा पहिला दिवस या होता आणि या दिवशी अनेक वर्षापासून नंदीध्वज मिरवणूकीची परंपरा होती. इंग्रजी कायदा झुगारून स्वातंत्र्य भोगणाऱ्या सोलापूरकरांवर दहशत बसवण्याची आणि पुन्हा कोणी आपल्या विरुद्ध उभे राहणार नाही ह्यासाठी इंग्रजांनी सर्वांना वचक बसावा म्हणून हा दिवस निवडला होता, महत्वाचे म्हणजे मल्लपा धनशेट्टी हे नंदीध्वज वाहक होते त्यांना फाशी झाली की भारतीय स्वातंत्र्यवीर धर्म रक्षक संपविला जाईल त्यामुळे हा दिवस इंग्रज सरकारने निवडला होता.

12 जानेवारी 1931 रोजी प्रथम जगन्नाथ शिंदे यांना वधगृहात नेण्यात आले. त्यानंतर किसन सारडा, मल्लप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन यांना फाशी देण्यात आली. सोलापूरचे चार हुतात्मे अमर झाले. त्या काळात ह्या चौघांना फाशी जाहीर झाल्यापासून ते फाशीच्या दिवसापर्यंत स्वातंत्र्यसमरात भाग घेतल्याबद्दल कुंजविहारीही त्याच तुरुंगात होते. त्या वेळी त्यांच्यात चांगलाच स्नेह निर्माण झाला होता. शायरी वृत्तीचा कुर्बान हुसेन ह्यांना भेटेन नऊ महिन्यांनी ही त्यांची कविता खूप आवडली. ते कुंजविहारी ह्यांना म्हणाले की, 'भेटेन नऊ महिन्यांनी' हे तुमचे गीत गातच मी फासावर जाईन' आणि खरोखरच 12 जानेवारीला भेटेन नऊ महिन्यांनी हे गीत गात ते हसत हसत फासावर गेले. ती कविता पुढीलप्रमाणे आहे.

***मनिं धीर धरीं, शोक आवरीं जननी । भेटेन नऊ महिन्यांनीं***
***॥ धृ० ॥ या न्यायाची, रीत मानवी असते । खरि ठरते, केव्हां***
***चुकते किति दुर्दैवी, प्राणी असतिल असले । जे अपराधाविण***
***मेले लाडका बाळ एकुलता फांशीची शिक्षा होतां***
***कवटाळुनि त्याला माता अति आक्रोशें, रडते केविलवाणी ।***
***भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ १ ॥***
***"किती वेळ असा, शोक करिसि गे असला । दे निरोप मज***
***जायाला होईल पहा, विफल तुझा आकांत । बाहेर उभे यमदूत***
***ते चाकर सरकाराचे नच उलटें काळिज त्यांचें***
***परि शरमिंदे अन्नाचे तुजपासुनियां, नेतिल मज ओढोनी ।***
***भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ २ ॥ तुज सोडुनि मी, जाइन कां गे इथुन***
***। परि देह परस्वाधीन बघ बोलति हे, बोल मुक्या भावाचे ।***
***मम दोरखंड दंडाचे अन्पाणि सेवुनि जिथलें***
***हें शरीर म्यां पोशियलें परदास्यिं देश तो लोळे***
***स्वातंत्र्य मला, मिळेल मग कोठोनी । भेटेन नऊ महिन्यांनीं ॥***
***३ ॥ कां परक्याला, बोल उगिच लावावा । दैवानें धरिला दावा***
***लाभेल कधीं, सांग कुणाला जगतीं । या जळत्या घरिं विश्रांती***
***घेऊनि उशाला साप येईल कुणाला झोंप हा सर्व ईश्वरी कोप***
***हा परवशता, करते भयकर करणी । भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ४***
***॥ मज फांशीची, शिक्षा दिधली जाण । न्यायाचा करुनी खून***
***या मरणाची, मौज कशी बघ असते । सांगेन तुला मी माते***
***मी राजपुत्र दिलदार घेऊनि करीं समशेर भोंवतीं शिपाई चार***
***करितील अतां, स्वागत जन मैदानीं । भेटेन नऊ महिन्यांनीं ॥***
***५ ॥ मजसाठिं तिनें, सिंहासन निर्मियलें । त्या एका खांबावरलें***
***मी वीर गडी, चढेन गे त्यावरतीं । इतरांची नाहीं छाती***
***इच्छिली वस्तु ध्यायाला अधिकारी तैनातीला***
***प्राणापरि जपती मजला या दुनियेची, दौलत लोळे चरणीं***
***। भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ६ ॥ या सर्वांचे मजवर भारी प्रेम ।***
***देतील खडी ताजीम हें वैभव मी, विकत घेतलें साचें । देउनी***
***मोल जिवाचें या गळ्यांतला गळफांस देईल घडीभर त्रास***
***लाभेल मुक्ति जीवास वर जाइन मी, लाथ जगा हाणोनी ।***
***भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ७ ॥ या देहाची, करुं कशाला चिंता***
***। होईल तें होवो आतां कुणि करुणेचे, सागर हळहळतील ।***
***कुणि हंसणारे हंसतील अश्रूंनीं न्हाऊ घाला प्रेमाचें वेष्टण***
***त्याला मातीचा मोहक पुतळा जाईल पहा, क्षणांत मातिंत***
***मिळुनी । भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ८ ॥ सांगतों तुला, शपथ***
***घेउनी आई । मरणाला भ्यालों नाहीं आठवीं मनीं, श्रीगीतेचें***
***सार । कीं नश्वर तनु जाणार हृदयाचे मोजुन ठोके बघ शांत***
***कसे आहें तें वाईट वाटतें इतुकें— तव सेवेला, अंतरलों मी***
***जननी । भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ९ ॥ माउली तुझा, नव्हें नव्हें***
***मी कुमार । पूर्वीचा दावेदार तव सौख्याच्या, वाटेवर निर्मियले***
***। दुःखाचे डोंगर असले नउ मास भार वाहून बाळपणी***
***बहुपरि जपुन संसार दिला थाटून परि बनलों मी, खचित***
***अभागी प्राणी । भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ १० ॥ 'मम बाळ गुणी,***
***वृद्धपणी बहुसाल । आम्हांला सांभाळील'***
***तव ममतेचे, बोल ऐकले असले । परि सारें उलटें झालें***
***माउली विनंती तुजला सांभाळ तिला, बाळाला***
***नच बघवे तिकडे मजला हा कठिण गमे, प्रसंग मरणाहहूनी***
***। भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ११ ॥ लाभतें जया, वीर-मरण***
***भाग्याचें । वैकुंठपदीं तो नाचे दे जन्म मला, मातृभूमिचे पोटीं***
***। पुनःपुन्हां मरण्यासाठीं मागेन हेंच श्रीहरिला मातृभूमि***
***उद्धरण्याला स्वातंत्र्यरणीं लढण्याला तव शुभ उदरीं, जन्म***
***पुन्हां घेवोनी । भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ १२ ॥ मग यमदुतें,***
***ओढुनि त्याला नेलें । व्हायाचें होउनि गेलें परि त्या ठायीं,***
***शब्द उमटती अजुनी । 'भेटेन नऊ महिन्यांनी' खांबाला***
***फुटतील फांटे मृदुसुमसम होतिल कांटे हिमगिरिला सागर***
***भेटे परि परवशता, सुखकर झाली नाहीं । दे कुंजविहारी ग्वाही***
***॥ १३ ॥***

*एकंदरीत कुंजबिहारी यांची भेटेन नऊ महिन्यांनी ही कविता खुदीराम बोस यांची देशाच्या स्वातंत्र्यासाठी फाशीवर जाताना जी भावनिकता असेल त्या भावनिक तिला अनुसरून नझरूल इस्लाम यांची प्रसिद्ध बंगाली कविता, त्याचबरोबर चौराचौरी येथील असहकार आंदोलनात पोलीस चौकी जाळल्याप्रकरणी एकोणीस जणांना फाशीची शिक्षा होणे आणि त्यातील एकाने आपण पुन्हा जन्म घेऊन मातृभूमीच्या रक्षणासाठी असे म्हणणें. मल्लप्पा धनशेट्टी, आणि त्यांच्यात इतर तीन साथीदारांची सोलापूरच्या तुरुंगातील कुंजबिहारी यांची भेट, मल्लपा धनशेट्टी यांच्या पत्नीचे गर्भवती असणे अशा अनेक लहान मोठ्या संदर्भासह भारतीय संस्कृतीतील पुनर्जन्माची संकल्पना गडद करणे आणि भारतीय संस्कृती लिखाणाद्वारे रसिकांच्या मनावर बिंबविणे. अशा एकाच वेळी देशभक्ती आणि संस्कृती आणि धर्मरक्षण ची संकल्पना देशवासीयांच्या मनात चेतविणे. म्हाताऱ्या आई-वडिलांसोबत असलेला जिव्हाळा, त्यांच्या संबंधी करावयाची कर्तव्य, पत्नी आणि मुलांचा सांभाळ तथा लालन पालन ह्या संदर्भात असलेली मानवी मनाची स्वप्ने आणि या सर्वांच्या पलीकडे जाऊन फक्त देश आणि मातृभूमी ह्या साठी जीवन समर्पित करणे. एका जन्मात मातृभूमीचे ऋण फिटले नाही म्हणून नव्याने जन्म घेण्याची आणि पुन्हा तो जीव आणि जन्म देशाच्या कारणी लावण्याची उदात्त भावना देणारी कुंजबिहारी यांची ही कविता आतापर्यंत काळाच्या छाताडावर अजरामर ठरणारी आहे यात शंका नाही. 12 जानेवारी 1931 रोजी सोलापूरचे हे चार सुपुत्र फाशीवर गेले आणि त्यानंतर साधारणपणे दोन सव्वा दोन महिन्यानंतर 23 मार्च 1931 रोजी भगतसिंग सुखदेव आणि राजगुरू हे तरुण देशासाठी शहीद झाले. ह्या सर्व शहीदांना आणि कुंजविहारी ह्यांच्या प्रतिभेला शतशः प्रणाम!*

---

# रंगीरंगलाश्रीरंग

आधुनिक केसरी



सौ. आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

पाड्यावरच्या एका माणसाने शहरातल्या माणसाबरोबर त्यांना विकायचा घाट घातला होता. गरिबीमुळे आईबाप पोटच्या मुलींना विकायला तयार झाले होते..... त्या आपली सुटका करून तिथून पळून आल्या होत्या. मुलींना चहा बिस्कीट देऊन त्यांना घरातच झोपायला सांगितले. फोनवरून आपल्या जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवू या विचारात ती खुर्चीवर बसली . तसाच तिचा डोळा लागला. मुलींची काळजी घेण्यासाठी तिच्या मदतीनीस असणारा शिवा, त्याला घरात ठेवून सकाळी सकाळी शिवाची बायको नंदाबरोबर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करायला निघाली. पण जांताना दोघींवर जिवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. मुलींची विक्री करणाऱ्या माणसांनीच हल्ला केला होता. तो हल्ला करून ती माणसं पळाली. पण सुधा आणि नंदा दोघींनी वाघिणीसारख्या हल्ला परतवून लावत पोलिस स्टेशन गाठलं. तिला आणि नंदाला पण खुप लागलं होतं... पोलिसांनी रितसर तक्रार नोंदवून दोघीनां उपचारासाठी दवाखान्यात दाखल केलं .... हळूहळू ही बातमी कलेक्टर साहेबांच्या कानावर आली. कलेक्टरसाहेबांना सुधाच्या आदिवासींसाठी आतापर्यंत केलेल्या कामाची माहिती होतीच ..... त्यांनी जातीने लक्ष घालत त्या लोकांना कशी अटक होईल हे बघितले.....सुधाला पोलिस प्रोटेक्शन दिलं. मुलींच्या आईबापला समज देत मुलींना घरी पाठवले. सुधाच्या आदिवासींसाठी काम करण्याच्या विचाराने प्रभावित झालेले कलेक्टर सुशांत तिच्या प्रेमात पडले होतेच, या प्रकरणानंतर त्यांनी तिला रितसर लग्नाची मागणी घातली... यथावकाश लग्न झाल्यावर कलेक्टर सुशांत आणि सुधा दोघेही नव्या जोमाने कामाला लागले. आदिवासी पाड्याचा विकासाच्या ध्येयाने झपाटलेल्या दोघांनी मिळून जवळपासच्या पाच सहा पाड्यासाठी एक दवाखाना, मुलामुलींच्या उज्वल भविष्यासाठी शाळा, महीला वर्गासाठी गोधडी , हस्तकलेच्या वस्तू तयार करून त्यांची विक्री करून स्वतःच्या पायावर उभं राहीला शिकवलं ,सक्षम केलं . त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. तर पुरुषांना व्यसनापासून दूर ठेवत सुतारकाम ,लोहारकाम शिकवून वस्तू तयार करून त्यांची विक्री करून आर्थिक पाठबळ मिळवून दिले. संपूर्ण देशातच नव्हे तर परदेशातही सुधासुशांतच्या केलेल्या कार्याचा गौरव करण्यात येत होता. त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येत होतं...... नंदीबैलवाल्या हेळवीने भविष्य न सांगताही आज खुप उज्वल, सोनेरी किनार लाभलेलं असंच होतं...... "रंगी रंगला श्रीरंग".......

---

# राजमाता जिजाऊ...!

आधुनिक केसरी

लखुजीराव जाधव
पत्नी ही म्हाळसाबाई,
यांच्या उदरी जन्मल्या
पवित्र माता जिजाई.

जिजाऊंचे बालपण
सिंदखेड गावी गेले,
त्यांचा विवाह शहाजी
भोसलेंशी थाटात झाले.

जिजाऊ गोष्टी सांगे शिवाला
महाभारत- रामायणतून,
युध्द विदया प्राप्त केले ते
दादोजी कोंडदेव कडून.

राजमाता जिजाऊने
पुण्याचा विकास केले,
सुसंस्कार करूनीया
शिवबास घडविले.

शिवबाचा राज्यभिषेक नि
स्वराज्याची स्थापना केले, हे
जिजाऊंने पाहील्याने
ते खूप आनंदीत झाले.

रायगडच्या जवळ पाचाड
या गावी, बारा दिवसाने,
वृध्दापकाळाने अखेर
प्राण सोडले जिजाऊंने...!



- अय्युब पठाण
लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

# आसुडाचा घाव (कथासंग्रह)



सुरज साठे
संपर्क क्र. 9370626619

आधुनिक केसरी

**"आसुडाचा घाव" हा माझा प्रथम कथासंग्रह प्रकाशित होत आहे. याचा फार आनंद होतोय. माझं वय हे फार लहान आहे. परंतु बालपणापासून लिहिण्याची, वाचण्याची, नवनवीन गोष्टीचा शोध घेण्याची मला फार आवड आहे.**

मी इयत्ता दहावी पास झालो. तशी दहावी मी चांगल्या टक्क्यांनी पास झालो. त्यामुळे घरच्यांच्या अपेक्षा वाढल्या. आई, वडिलांची इच्छा होती की मी सायन्सला जावं. पण माझं मन हे त्या क्षेत्राकडे जाण्यासाठी तयार नव्हत. पण आई वडिलांना ही गोष्ट सांगायची कशी म्हणून मी ही गोष्ट माझ्या मामा जवळ बोललो. मला समजून घेणार माझ्या प्रत्येक गोष्टीत माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ राहणार एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे माझे हणमंत मामा. मामांनी वडिलांना समजावलं वडील थोडे रागावले पण नंतर त्यांनी ही मान्य केलं. मग मी आर्ट्स मधून आकरावीच्या वर्गात दाखल झालो. वाचनाची मला प्रचंड आवड होतीच त्यात मित्रांनी एक गोष्ट मनात भरवली होती ती म्हणजे आकरावीत जास्त अभ्यास करायला लागत नाही. मग मी थोडा मोकळा झालो अन् माझा वाचनाचा छंद जोपासायला लागलो. बुद्ध, तुकाराम, फुले, शाहू, आंबेडकर अशा सर्व महामानवांच मला जे जे साहित्य मिळेल ते, ते मी वाचत सुटलो. अन् त्या वाचनाने माझ्यात एक वेगळीच ऊर्जा तयार झाली. मी मूळचा वाटेगावचा असल्याने लहानपणापासून चळवळ माझ्या डोक्यात भिनतच होती. मी इयत्ता सहावीत असताना, माझ्या जीवनातील पाहिलं पुस्तक म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची फकिरा कादंबरी वाचली. अन् ती कादंबरी वाचत असताना माझ्या डोळ्यातून आपोआप पाणी गळायच अन् कंठ दाटून यायचा. माझं मन मला म्हणायचं माझ्या गावातला, माझ्या रक्तातला हा नायक अन् ते माझे पूर्वज इथल्या जुलमी व्यवस्थेशी लढतात, झुंजतात, प्राणाची बाजी लावतात. अन् ही जुलमी व्यवस्था, इथले धनदांडगे साऱ्या दुनियेचं दुःख त्यांच्या पदरी टाकून मोकळे होतात. माणूस असून त्यांना जनावराची वागणूक देतात. त्यांना दावणीला बांधतात, त्यांचा कडेलोट करतात, त्यांना साखळदंडात जोखडतात हे सर्व वाचून माझ्या अंगाची लाही लाही व्हायची अन् अस वाटायचं की फकिरा चा तो लढा आपण तलवार हातात घेऊन पुरा करायचा अन् या जुलमी व्यवस्थेला कापून काढायचं. ती फकिरा कादंबरी इयत्ता सहावीत असताना माझ्या तोंडपाठ झाली होती. माझं वय वाढत होत पण हृदयातील ती आग थंड होत नव्हती. वाढत्या वयानुसार समज येत गेली अन् तलवारीची जागा लेखणीने घेतली. अन् ती लेखणी घेऊन या व्यवस्थेविरुद्धच्या लढाईला मी आरंभ केला. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे म्हणतात "काल्पनिकतेचे पंख लावून आकाशात उंच झेप घेणारा मी नाही. जे साकार नाही. त्याला आकार देण्याचे सामर्थ्य माझ्यात ठायी नाही." अण्णाभाऊंचा हा विचार घेऊन मी लिखाणास सुरुवात केली. अन् त्यातूनच "आसूडाचा घाव" हा कथासंग्रह मी लिहिला. या कथासंग्रहातील काही कथा या मी स्वतः बघितल्या आहेत अनुभवलेल्या आहेत. जग बदल घाव या कथेचा नायक माझेच पाहुणे आहेत. आजच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात लोक जात व्यवसाय जास्त करत नाहीत अस फक्त म्हटल जात पण वास्तव पाहता. छोट्या - छोट्या गावांमध्ये, खेड्यापाड्यांमध्ये हा व्यवसाय अतिशय जोमाने सुरू आहे.

पोटाची खळगी भरण्यासाठी लोक हा व्यवसाय निष्ठेने करतात. पण त्यांच्या मेहनतीसारखा मेहेनताना त्यांना मिळत नाही. आणि हा जातीचा व्यवसाय त्यांच्या अंगवळणी पडल्याने लोक तो व्यवसाय सोडत देखील नाहीत. अन् यातूनच पिढ्याच्या पिढ्या दुःख, दारिद्र्य, गुलामी अन् अंधारातच जीवन व्यथित करतात. अन् काही लोक असे असतात की जातीचा अभिमान म्हणून त्या व्यवसायांना प्रेरित करतात. अन् त्यांना दारिद्र्याच्या खायीत लोटतात. पण जे लोक ही गुलामी नाकारतात ते माणसात येतात अस मला वाटत. त्या कथेचा संदर्भ माझ्याही जिवनात लागू पडतोय. कारण माझ्या पूर्वजांनी म्हणजेच पंजोबा, आजोबा, वडील, चुलते एवढंच काय तर माझ्या चुलत भावंडांनी देखील हा केरसुणीचा जात व्यवसाय केलाय. परंतु माझ्या वडिलांनी त्या व्यवसायाची झळ मला कदापि लागू दिली नाही. जस जसा माझ्या कुटुंबात शिक्षणाचा प्रसार होत गेला तस तसा आमच्या घरातून हा धंदा कायमचा निघून गेला. माझे वडील शिक्षित आहेत. माझी सर्व भावंड शिक्षित आहेत. अन् म्हणूनच त्यांनी हा जातीचा व्यवसाय नाकारला अन् आम्ही माणसात आलो. माझी दुसरी कथा "वावग" ही कथा मला माझ्या आजोबांकडून मिळाली आजोबांच वय आता पंच्याऐंशीच्या घरात आहे. एके रात्री आजोबा झोपेमध्ये चावळत होते. अन् मी उशिरापर्यंत जागून वाचन करत होतो. आजोबांच्या तोंडून चार ओळी बाहेर पडल्या "तेव वावग वागला म्हणून त्याची ही गत झाली. त्याच्या मड्याला कोण वाली उरला न्हाय." मी याच ओळींचा रात्रभर विचार करीत होतो. अन् दुसऱ्या दिवशी मी आजोबांना ही गोष्ट विचारल्यावर त्यांनी ही कथा मला सविस्तर सांगितली. माझी "संशयाची आग" या कथेची उकल देखील आजोबांनीच केली. या कथा जरी जुन्या असल्या. भूतकाळात घडलेल्या असल्या तरी त्या आजच्या समाजजीवनाशी तंतोतंत जुळतात. आणि आजच देखील वास्तव समोर ठेवतात. जो वाईट वागतो, वावग वागतो त्याचा देखील शेवट वाईटच होतो. अन् संशयाची आग एकदा काळजात भिडली की ती सार जाळून भस्म करूनच थंड होते. अशा या कथांचा अन् अनुभवाचा अनमोल खजिना मला माझ्या आजोबांकडून मिळाला.




माझा हेतू फक्त एवढाच आहे समाजाने या गोष्टींचं बारकाईने निरीक्षण कराव आणि सावध व्हावं. लेखक म्हणून मला सर्वात जास्त भावलेली कथा म्हणजे "कलंक" एका स्त्रीच्या जीवनातील संघर्ष मी रेखाटत असताना मी खूप भावूक झालो होतो. माझा पेन ती कथा लिहीत होत अन् मन मात्र माझं रडत होत. माझ्या दोन्ही डोळ्यांतून अश्रुंच्या धारा कागदावर टपकत होत्या. अन् मी स्वताला सावरून लिखाण पूर्ण करत होतो. एक स्त्री आपल्या कटू जीवनाशी, व्यवस्थेशी आपल्या चारित्र्याच पावित्र्य राखत लढू शकते. या विषमतावादी विश्वात संघर्षातून आपल सामर्थ्य निर्माण करू शकते हे या कथेतून मला दाखवायचं आहे.


माझी "आसुडाचा घाव" आणि "देवताळपण" या कथा म्हणजे माझ्या जीवनात मी बघितलेले अतिशय वाईट प्रसंग आहेत. जो आसूड या व्यवस्थेवर फिरायला पाहिजे तो आसूड देवा धर्माच्या नावाखाली पोटासाठी माणसाच्या पाठीवर पडतो. आणि स्वताला मानस म्हणवून घेणारी मानस त्यांनी मारून घेतलेल्या घावावर आश्चर्य व्यक्त करतात. आणि म्हणतात त्यांना लागत नाही ते देवाच असत. अरे पण ज्याच जळत त्यालाच ते कळत. पाठीवर बसणाऱ्या घावापेक्षा पोटावर बसणारा घाव हा फार भयानक असतो. पोटावरचा घाव हुकवण्यासाठी ती मानस पाठीवर घाव घालून घेतात. अन् इथली मानस त्यांना देवाच लेबल चिटकवून मोकळी होतात. हे चित्र कुठतरी बदलल पाहिजे तरच या देशाचं कुठेतरी भल होईल अस मला वाटत. अन् समाजात असे काही लोक असतात जे देवाच्या नावावर सामान्य जनतेला लुटतात अन् सुशिक्षित सामान्य जनता देखील त्यांच्या आर्थिक शोषणाला बळी पडते. अन् यातूनच अंधश्रद्धेची निर्मिती होते. सुशिक्षित सुजाण नागरिकांनी हे षडयंत्र ओळखून अशा भामट्या लोकांना अद्दल घडवली पाहिजे असे मला वाटते. माझी "तमासगीरीन" ही कथा २० व्या शतकात घडून गेलेली आहे. अन् त्याचा संदर्भ आज देखील इथल्या समाजव्यवस्थेला लागू पडतो. कलेला जात, धर्म, प्रांत, गरीब, श्रीमंत, पद, प्रतिष्ठा याच बंधन कधीच नसत. पण इथला समाज बंधने लावून कलावंताच्या कलेचा जीव घेत असतो. हे वास्तव या कथेच्या माध्यमातून मी दाखवण्याचा प्रयत्न केलाय. "रक्ताळलेल प्रेम" आणि या "मातीत दरवळणारा प्रेमाचा सुगंध" या कथा प्रेमावर आधारित आहेत. प्रेम हे कधी, कुणावर, का, कशासाठी, कस, कशापद्धतीन होईल हे सांगता येत नाही. आणि कोणीतरी म्हटलय की प्रेम हे आंधळ असत. आणि आजच्या युवतींनी या आंधळेपणातून बाहेर येऊन विचार करून प्रेम करावं असं मला वाटत. माझा प्रेमाला विरोध नाही कारण जग हे प्रेमानं जिंकता येत. पण ते प्रेम डोळे उघडे ठेऊन करावं. प्रेमाचा इथल्या जातव्यवस्थेने गळा दाबलाय अन् त्याचा गळा दाबून प्रेमी युगुलांचा देखील जीव घेतलाय. हे चित्र कुठेतरी बदलल पाहिजे तुलना ही जातीवर नाही तर कार्यकर्तृत्वावर व्हावी.

मी या कथासंग्रहाची निर्मिती परिवर्तनवादी विचार डोळ्यांसमोर ठेवून केलेली आहे. मी जे सांगतोय, लिहिलंय ते अंतिम सत्य आहे अस मी मुळीच म्हणणार नाही. जे मला दिसल जे मी अनुभवलय तेच मी लिहिलंय मला कोणाच्या भावनांशी खेळायच नाही. तर माझ्यापरीने जेवढं सत्य मला मांडता येईल ते मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न या कथासंग्रहाच्या माध्यमातून मी केलेला आहे. यातलं जे काही चांगल आहे ते मायबाप सुज्ञ वाचक जनतेच आहे. आणि वाईट आहे ते माझं आहे. अन् मायबाप वाचकांनी यातलं चांगल तेवढं घ्यावं आणि वाईट आहे ते टाकून द्यावं.

# भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री

आधुनिक केसरी

भारतमातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज ५७ वा स्मृतिदिन आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित



नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर नंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली.

शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले.आज ५६ व्या स्मृतिदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

# अनुभव हाच खरा मार्गदर्शक!

आधुनिक केसरी

अनुभव हाच खरा मार्गदर्शक, माणसाला आयुष्यामध्ये अनेक अनुभव येत असतात. सतत अनुभवातून तो काही ना काही शिकत असतो. अनुभवातुनच माणुस जास्तीत शिकला जातो. त्यासाठी जिवनात अनुभवाला खुप मोठे महत्त्व आहे. सभोवताच्या सामाजिक स्तरातून आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात. काही गोष्टी आत्मसात कराव्या लागतात तर काही अनूभवातुन शिकावयास लागतात. अनुभवातुन ज्यावेळी माणसाचा कस लागतो. त्याचवेळी माणुस शहाणा होत असतो. ज्या -ज्यावेळी आपल्याला नवनवे अनुभव पहायला मिळतात. यातुनच माणुस आपसुकच घडला जातो. प्रत्येक वेळेस आपण प्रयत्न करून देखिल आपल्या हातात काही लागत नाही त्यावेळी अनुभव आपल्या कामी येतो.यात काही शंका नाही. अनुभव आपल्याला जिवनात शिकवण देत असतो. कोणतीही गोष्ट आपण करताना आपण चुकतो. चुकु द्या कारण चुकीतुनच माणुस शिकतो व आपल्याला एक प्रकारचा अनुभव देऊन जात असतो. विविध प्रकारच्या अनुभवांमुळे आपल्याला आयुष्याची वाटचाल योग्य दिशेने करण्यास सहज मदत होते. जन्म आणि मृत्यू मधील प्रवास म्हणजेच जिवन होय. या जिवनात आपण प्रत्येक गोष्टीला कसे सामोरे जातो ते महत्वाचे आहे. जिवनात येणाऱ्या अनुभवातून आपल्याला बरेच काही शिकण्यासारखे आहे. अनुभव हाच खरा मार्गदर्शक आहे. आयुष्यात जरी चढउतार आले तरी अनुभव आपल्या पाठीशी आहे हे विसरता कामा नये. अशा वेळेस अनुभव आपल्या कामी येत असतात. आयुष्यात येणारे अनुभव आपल्याला खर्या अर्थाने जिवन संपन्न बनवत असतात. अनुभवासारखे दुसरा कोणताही मार्गदर्शक असु शकत नाही. अनुभवासारखे दुसरे कोणतेही शिक्षण नाही.स्वताःच्या अनुभवातून व इतरांच्या अनुभवातून आपण नेहमी शिकले पाहिजे.काही गोष्टी ह्या अनुभवातून आपल्याला अनुभवायला मिळतात.

जिवनात अनुभव हे नुसते साठवुन ठेवायचे नसतात तर ते उपयोगात आणायचे असतात.जिवनात आपल्याला अनेक परीक्षांचा सामना करावा लागतो.परंतू यात पास व्हायचे असेल तर अनुभव आपल्या पाठीशी पाहिजे. ज्याच्याजवळ अनुभवाची शिदोरी आहे त्याला काही कमी पडत नसते.कारण तो अनुभवाच्या जोरावर अशक्य गोष्ट सहज साध्य करू शकतो. या अनुभवातून तो शहाणा होत जातो.त्यासाठी अनुभवाला खुप मोठे महत्त्व आहे. त्यामुळे आयुष्यात अनुभवासारखा दुसरा मार्गदर्शक असुच शकत नाही. जीवन अनमोल आहे जीवनात अनुभव हाच खरा मार्गदर्शक आहे.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क ७७२१०४५८४५

# रेल्वेला उशीर झाला तर तिकिटाची संपूर्ण रक्कम परत मिळणार, सोबत नाश्ता- जेवणही फ्री

आधुनिक केसरी

रेल्वेने प्रवास करत असताना रेल्वे गाडीला उशिर झाला तर तिकिटाची संपूर्ण रक्कम परत दिली जाणार आहे. तुम्ही प्रवास करत असणाऱ्या एक्स्प्रेसला तीन तासांपेक्षा जास्त उशिर झाल्यास तिकिटाचे सर्व पैसे रिफंड मिळणार आहेत. एवढेच नाही तर नाश्ता- जेवणही फ्री मिळणार आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलेली मोठी घोषणा निश्चित स्वागतार्ह आहे अनेकदा एक्स्प्रेस विविध कारणांमुळे उशिरा धावत असतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप



सहन करावा लागतो. त्यात तिकीट रद्द केल्यास पूर्ण रिफंड मिळत नाही. निष्कारण रल्वेची वाट पाहत रहावे लागते त्यामुळे वेळ व पैसा वाया जातो संपूर्ण दिवसभरातील महत्वाच्या कामांचे नियोजन बिघडून जाते काही वेळेला जेवण सुद्धा मिळत नाही या प्रवासादरम्यान बालकापासून ते वयोवृद्धापर्यंत सर्वांचाच समावेश असतो त्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते पण आता यात बदल करण्यात आला आहे. आता ३ तास ट्रेन उशिराने असल्यास, तिकीटाचे संपूर्ण पैसे मिळणार आहेत. मग ती तिकीट कन्फर्म असो किंवा मग आरएसी.हिवाळ्यात अनेकदा धुक्यात गाड्या उशिराने धावतात. त्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. परंतु अशा परिस्थितीत रेल्वे तुम्हाला अनेक सुविधा देते. मात्र, प्रवास करणारी रेल्वे गाडी तीन तास उशिराने असेल तर तिकीट परताव्याची संपूर्ण रक्कमही परत करण्याचा रेल्वे मंत्र्यांनी घेतलेला निर्णय स्वागतार्ह आणि रल्वे प्रवाशांच्या हिताचा आहे !!

राजू जाधव
मांगूर जि.बेळगांव

# भ्रष्टाचारात गुरफटलेले नायब तहसीलदार अविनाश अंकुश यांची लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करा : आ. प्रशांत बंब



आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** अवैध धंदे करणाऱ्या तस्करांशी संगनमत करणाऱ्या भ्रष्ट नायब तहसीलदार अविनाश अंकुश यांच्या व त्यांच्या नातलगाच्या संपतीची चौकशी करा, असे लेखी पत्र थेट जिल्हाधिकारी आस्तिककुमार पांडेय यांना आ. प्रशांत बंब यांनी दिले. नायब तहसीलदार अविनाश अंकुश हे गंगापुर तालुक्यामध्ये होत असलेल्या अवैध वाळू उपसा व वाळूसाठा तस्करांबरोबर संगणमत करुन भ्रष्टाचार करत असल्याने त्यांना मुख्यालयी ठेवून सखोल चौकशी होईपर्यंत अकार्यकारी पदावर ठेवण्यात यावे अशी तक्रार आ. प्रशांत बंब यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे केली आहे.तक्रारीत म्हटले आहे की गंगापुर तालुक्यामध्ये अनेक ठिकाणी वाळू उपसा सुरु असुन उदाहरणअर्थ शेंदुरवादा, शिवुपर,धामोरी बु,कासोडा,नेवरगांव, मेहंदीपुर,लांझी इत्यादी ठिकाणावरुन मोठ्या प्रमाणात वाळू उपसा/साठा करणे सुरु आहे तथापी याबाबत संबंधित लोकप्रतिनीधी यांनी तहसिल कार्यालय गंगापूर येथे तक्रार देखील केलेली आहे. त्यावर तहसिल कार्यालयाकडून कार्यवाही होत नसून उलट तहसिलकार्यालयातील नायब तहसिलदार अविनाश अंकुश हे सदरील अवैध धंदे करणाऱ्या तस्करांशी संगणमत करुन भ्रष्टाचार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत आ. बंब यांनी वारंवार तालुक्यात सुरु असलेला अवैध वाळू उपसा बंद करणेबाबत कळविलेले आहे तथापी नायब तहसीलदार अविनाश अंकुश हे पुर्णपणे भ्रष्टाचारमध्ये गुंतलेले असून त्यांची मनोवृत्ती भ्रष्टाचाराची आहे. तसेच त्यांचे व इतरांच्या नांवे अवैध संपत्ती खरेदी केल्याचे समजते करीता अविनाश अंकुश यांना मुख्यालयी ठेवून त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल चौकशी करण्यात यावी व तसेच चौकशी होईपर्यंत त्यांना अकार्यकारी पदावर ठेवण्यात यावे अशी मागणी आ. प्रशांत बंब जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे केली आहे.



# राजूर येथे जिजाऊ जन्मोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वाला वाव मिळावा म्हणून राष्ट्रमाता माँसाहेबजिजाऊव स्वामी विवेकानंद यांच्याजयंतीनिमित्त राजमुद्रा फाऊंडेशन व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा राजूर यांच्या वतीने जी.प.शाळेच्या प्रांगणात शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजनकरण्यातआले होते.यावेळी विद्यार्थ्यांनी ओघवत्या शैलीतील भाषणातून उपस्थितांची मने जिंकली. राजूर येथे माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.त्या निमित्ताने राजमुद्रा फाऊंडेशनच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनकरण्यातआले. नंतर विद्यार्थ्यांनी गितगायन, वेशभूषा, भाषण यासारख्या कला सादर केल्या.

यावेळी स्पर्धक विद्यार्थ्यांनी माँसाहेबजिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद आदी महापुरुषांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. चिमुकल्या वक्त्यांनी आपल्या भाषण शैलीतून उपस्थितांची मने जिंकली. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व शालेय साहित्य बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या विजेत्या स्पर्धांकामध्ये अनुक्रमे विजेते विद्यार्थी शिवानी गजानन बोकाडे,मयूरी दिलीप मगरे,रितिका प्रवीणकुमार शिंदे,समीक्षा मिलिंद मगरे,प्रांजल संतोष पुंगळे, कल्याणी पोटे,सोफियान सादिक,प्रिया हिवराळे, आदी विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते समूर्तीचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# दयानंदमध्ये गुणवंतांचा कौतुक सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद शिक्षण संस्था द्वारा संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय लातूर येथे सांस्कृतिक विभागाद्वारा ज्या विविध जिल्हास्तरीय, विभागीय तथा राज्यस्तरीय स्पर्धा मध्ये दैदीप्यमान यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सामूहिक गुणगौरव समारंभ संपन्न झाला. महाविद्यालयातील विद्यापीठ परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार देखील यात करण्यात आला. यामध्ये कु. शेख सुहाना इसाक ही विद्यार्थीनी बी.कॉम परीक्षेत विद्यापीठातून सर्वप्रथम आली असून तिने चार गोल्ड मेडल प्राप्त केले आहेत. तर बी.कॉम विथ बँकिंग अँड इन्शुरन्स परीक्षेमध्ये महामुरे ज्योती -प्रथम, जगताप तनुजा -द्वितीय व जाधव अंजली -तृतीय आली आहे. "अविष्कार" स्पर्धेत बीबीएच्या सेजल कोटेचा हिने प्रथम क्रमांक मिळवला आहे.या नेत्रदीपक यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभासाठी उपस्थित दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, ललितभाई शहा, अरविंद सोनवणे, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष तथा शालेय समिती सदस्य संजय बोरा, सदस्य दीनानाथ भुतडा, विशाल लाहोटी, विशाल अग्रवाल, प्र.प्राचार्य डॉ.राजाराम पवार, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड, कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी गायकवाड, पर्यवेक्षिका डॉ.अंजली बुरांडे, समन्वयक प्रा. सुभाष मोरे, प्रा.शशिकांत स्वामी, प्रा.डॉ.नितीन स्वामी, प्रा. डॉ.विशाल वर्मा, प्रा.डॉ.बालाजी कांबळे, प्रा.डॉ.कविता बियाणी तसेच शिक्षक वृंद तथा शिक्षकेतर कर्मचारी व सर्व सत्कारमूर्ती विद्यार्थी आदींची प्रमुख उपस्थिती होती.





# औराळा येथील जि.प.शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील औराळा येथील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डी. पी.पवार, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा अर्चना योगेश खिरडकर, सरपंच सोनाली सुरेश बागुल, ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत बागुल, दिशांत जिवरख, सुनील निकम, दिनेश वाघ, शाळेतील शिक्षक योगेश मुळे, प्रधान सर, मगर मॅडम, देवरे मॅडम पालक वर्ग योगेश खिरडकर, प्रंशात पगारे, राहुल पगारे महेंद्र पगारे, भाऊसाहेब घोलप, भालचंद्र वाघ, ज्ञानेश्वर बागुल, जावेद मणियार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# खेळाडूंच्या मातांचा राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**रामभाऊ आवारे**

**निफाड :** नाशिक जिल्ह्यातील विविध क्रीडा प्रकारांत राज्य व राष्ट्रीय पातळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला.

निफाड शहरातील सरस्वती विद्यालयाच्या सभागृहात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सौ प्रियाताई चोरडिया( शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सरस्वती विद्यालय, निफाड सौ.जयश्री ताई काळे (ग्रा.प.सरपंच, श्रीरामनगर) अध्यक्षस्थानी असलेले अरुण महाजन (मुख्यध्यापक, निफाड इग्लिंश स्कुल. निफाड) यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी मा.श्रीम.ज्योती भागवत (मुख्याध्यापिका सरस्वती विद्यालय,निफाड ), मा.श्री.खंडु किट्टे (महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा निफाड), शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड हे मान्यवर



उपस्थित होते. जिजामातेने स्वराज्याचा संस्थापक शिवबा घडविला त्याप्रमाणे प्रत्येक मातेने आपला पाल्य घडविला पाहिजे, उत्तम सुसंस्कार केले पाहिजे, असे मार्गदर्शन माता व विद्यार्थ्यांना कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या प्रिया चोरडिया यांनी केले. तसेच "अशी असावी माता जिचा वाटावा अभिमान, पुत्र घडविला ऐसा जो राष्ट्राची शान...." या उक्तीप्रमाणे आपणही आपल्या पाल्यास जिजाऊ मातेच्या प्रेरणेतून सुसंस्कार देऊन भारताचा एक चांगला नागरिक व खेळाडू बनवण्याची प्रेरणा दिली हे कार्य न विसरण्यासारखे आहे असा उल्लेख शिव आविष्कार स्पोर्ट्स फाउंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड यांनी आपल्या भाषणातून केले. या प्रसंगी राष्ट्रीय व राज्य खेळाडूंच्या आई पद्मा कैलास बिरार, रेखा बाबू सानप, योगिता महेश तवर, अंजली विष्णु पेखळे, उज्वला रविंद्र बोरगुडे, अन्नपुर्णा राजेंद्र जंगम, मिना वाल्मिक जाधव, सुनिता संतोष गाडेकर, ज्योती अविनाश बागडे, प्रतिभा रमेश मानकर,अश्विनी शाम चौधरी, कल्पना दिलीप बोदडे, अरुणा बबन काळे,मंगला विनोद गायकवाड, सुनिता उत्तम घोटेकर, शशिकला भरत घटमाळे यांचा फेटे बांधून मानपत्र व सन्मानचिन्हं देवून गौरव करण्यात आला.

# औराळा ग्रामपंचायत येथे राजमाता जिजाऊ यांची ४२५ वी जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा ग्रामपंचायत कार्यालय येथे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मासाहेब यांची ४२५ जयंती औराळा ग्रामपंचायत येथील साजरी करण्यात आली, राजमाता यांच्या फोटोला वंदन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यावेळी गावातील नागरिकांची उपस्थिती दर्शवली होती. यावेळी औराळा ग्रामपंचायतचे सरपंच सोनाली सुरेश बागुल, ग्रामसेविका सुजाता गवई, उपसरपंच आकाश पगारे ,ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत, बागुल दिशांत, जिवरख विठ्ठल गुजराणे, दिनेश वाघ, देविदास राठोड, सुनील निकम. ग्रामपंचायत कर्मचारी गणेश कुदळे नवनाथ गुजराणे आदींची उपस्थिती होती.

# वैजापूर आगारामार्फत सुरक्षितता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ वैजापूर एस, टी, डेपो मार्फत बुधवार (दि,११) रोजी सुरक्षितता अभियान अंतर्गत सडक सुरक्षा -जीवन रक्षा या अंतर्गत बस चे चालक,वाहक व यांत्रिक कामगार यांच्या प्रबोधनार्थ मेळावा संपन्न झाला,२५जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या पंधरवाड्याचे फीत सोडून तहसीलदार राहुल गायकवाड स.पो.नि. विजय नरवडे,मनोज पाटील,धोंडीरामसिंह राजपूत व आगार व्यवस्थ्यपक एच.बी.नेरकर यांनी उदघाटन केले,प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत श्री नेरकर यांनी केले. रस्त्यावर बस चालविताना घायव्याची खबरदारी, प्रवाशी सुरक्षा, चालक, वाहक यांच्या मन स्वास्थ्य बाबत मार्गदर्शन ,डोळ्यांची निगा, प्रवाशांची काळजी घेणे, बस चालविताना मोबाईल वापर टाळणे,व्यसन टाळणे वयाबाबत मार्गदर्शन करण्यात आले,दिव्यांग ना सहाय्य करणे,इत्यादी बाबत तहसीलदार राहुल गायकवाड व राजपूत यांनी मार्गदर्शन केले, शेवटी सर्व वाहक व चालक यानी प्रवाशी सुरक्षा, रस्ते



सुरक्षा बाबत शपथ घेतली, या प्रसंगी पोलीस स्टेशनचे गोपनीय शाखेचे घोटकर,तहसिलचे संतोष जाधव, गायकवाड उपस्थित होते, महामंडळचे पी.डी. रामटेके, बी.के.गरुड, वाहतूक निरीक्षक एस.जे. पवार, पी.एच. सोनवणे, जे.बी. कोकाटे, एल. के. साळुंके, आर.एस. मुळे, वाहन परीक्षक यु. एफ. कलमबे, पी.एल. जाधव, पी.आर. विसपुते, यांच्यासह चालक, वाहक व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन बी.के. गरुड यांनी केले.

# समाजात बंधुतेचा विचार रुजविण्याची गरज

## शंकर आथरे यांचे प्रतिपादन; चोविसाव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आज समाज विविध जाती आणि धर्मामध्ये विभागला आहे. अशावेळी बंधुतेची पताका हाती घेऊन समानतेच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्याची आस असलेले वारकरी घडविले पाहिजेत. दिवसेंदिवस दुभंगत चाललेल्या समाजामध्ये पुन्हा एकसंधपणा आणायचा असल्यास बंधुतेचा विचार खोलवर रुजविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन चोविसाव्या राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक शंकर आथरे यांनी केले.

राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद आणि औंध येथील रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय या संस्थाच्या वतीने नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक शंकर आथरे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होत आहे. बंधुतेची ज्योत प्रज्वलित करून संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी संमेलनाचे उद्घाटक प्रसिद्ध साहित्यिक सायमन मार्टिन, राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे, स्वागताध्यक्ष दंतरोपण तज्ज्ञ डॉ. विजय ताम्हाणे, निमंत्रक डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, ज्येष्ठ विचारवंत प्रकाश जवळकर, लेखक-कवी चंद्रकांत वानखेडे, संयोजक व मराठी विभाग प्रमुख प्रा. प्रभंजन चव्हाण उपस्थित होते.

उद्घाटनावेळी मेघना पाटील (डोंबिवली), दिवाकर जोशी (परळी वै.), रघु देशपांडे (नांदेड), ज्ञानेश्वर शिंदे (कोपरगाव), रघु गरमडे (चंद्रपूर), राजू आठवले (सिल्लोड), रामदेव सित्रे (अकोला), अनुया काळे (मुरबाड) यांना 'बंधुता शब्दक्रांती साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दुसऱ्या सत्रामध्ये ज्येष्ठ गझलकार सिराज शिकलगार यांच्या अध्यक्षतेखाली काव्य पंढरी कवी संमेलन झाले. कवी गुलाब राजा फुलमाळी यांना 'लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार', कवी



किशोर भुजाडे यांना 'लोक गायक प्रल्हाद शिंदे पुरस्कार' आणि कवी अमोल घाटविसावे यांना 'पद्मश्री नामदेव ढसाळ काव्य पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

शंकर आथरे म्हणाले, "लेखकाने सूक्ष्म निरीक्षणातून मांडणी करत समाज कायम जागता ठेवण्याचे काम केले पाहिजे. चिंतनशील व प्रबोधनात्मक लेखनाने समाजातील संवेदनशील मन घडवतानाच चांगल्या मार्गावर नेण्याचे काम केले पाहिजे. बंधुतेचा विचार जाती-धर्माचा भेद विसरून एकत्रित नांदायला लावण्याची प्रेरणा देतो. महाराष्ट्रात प्रबोधनाचा मोठा वारसा आहे. हा वारसा जपण्याचे काम अशा साहित्य संमेलनामधून होतो. नव्या पिढीमध्ये राष्ट्राभिमान जागृत ठेवत मूल्यशिक्षणाचा प्रचार करणे आणि बंधुता चळवळ अधिक बळकट करण्याचा प्रयत्न आपण करायला हवा."

सायमन मार्टिन म्हणाले, "जग घडविण्यामध्ये साहित्यिकांचे मोठे योगदान आहे. आज माणूस जात, धर्म, वर्ण, पंथ, भाषा, प्रांत यामध्ये विभागला गेला आहे. दुसऱ्यांचे अस्तित्व आणि विचार मान्य करायचे नाहीत अशा टोकापर्यंत समाज पोहोचलेला आहे. हा विचार दूर करण्यासाठी बंधुतेचा विचार पुढे आणला पाहिजे. यासाठी अशी संमेलने उपयुक्त ठरतात व त्यातून समाजाच्या संवेदना जागृत राहतात.

प्रकाश रोकडे म्हणाले, "साहित्यिक आणि कलावंताची एकच भाषा असते ती म्हणजे देश. आज जाती-धर्माच्या भिंती उभ्या राहिल्यामुळे देशात भयाचे व चिंतेचे वातावरण आहे. देशात पुन्हा एकदा इंग्रजांच्या गुलामगिरीप्रमाणेच व्यवस्थेची गुलामगिरी येते की काय अशी स्थिती असून, सहिष्णुता आणि मानवता धोक्यात आली आहे. या काळामध्ये बंधुता समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविले पाहिजे. प्रकाश जवळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.



# व्यक्ती जरी निघून गेली तरी व्यक्तिमत्व टिकून राहील असे जगा : शालिनीताई इंदुरीकर

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** येथे श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान गंगापूर आयोजित भव्य कृषी प्रदर्शन व वारकरी सस्तंग मेळाव्याला सुरवात काल महंत रामगिरी महाराज व गाथा मूर्ती रामभाऊ महाराज राऊत यांच्या हस्ते व शेतकऱ्याच्या उपस्थिती मध्ये झाली या प्रदर्शनामध्ये शेतीशी निगडित विविध कंपन्यानी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. यामध्ये दुग्ध व्यवसाय, नवीन पद्धतीने तयार केलेले रोपे, ट्रॅक्टर व इतर अवजारे जाणवरांच्या आरोग्य विषयक, आधुनिक खते व औषध घरगुती साहित्याचे, विजेचे ट्रान्सफर्मर, विविध महिला बचत गटाचे विविध स्टॉल 100 स्टॉल प्रदर्शनामध्ये मांडण्यात आले आहे या प्रदर्शनास जेष्ठ हवमान तज्ञ पंजाबराव डख यांची भेट व मार्गदर्शन झाले तसेच गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब, किरण पाटील डोणगावकर, विजय मनाळ, लक्ष्मण सांगळे या मान्यवरांची भेटीगाठी झाल्या. या प्रदर्शनामध्ये नवीन ट्रॅक्टर औजारे व इतर उलाढाल मिळून पहिल्याच दिवशी एकूण 20 ते 25 लाखाची उलाढाल या प्रदर्शनाच्या माध्यमातून झाली आहे दुसऱ्या दिवशी म्हणजे 12 जानेवारी रोजी शालिनीताई इंदोरीकर यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.

यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीनिमित्त कर्तृत्वान महिलांचा सत्कार याठिकाणी करण्यात आला. या कार्यक्रमासाठी स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान चे अध्यक्ष वाल्मिक सिरसाठ सचिव डॉ आबासाहेब सिरसाठ श्रीकांत कुमावत, प्रमोद महाजन, करण खोमणे, संतोष खाडे, रामेश्वर म्हस्के, संतोष शिंदे, संतोष शिंदे, नामदेव सांगळे, गोविंद जाधव,अमर राजपूत,जिवन राजपूत, योगेश बिलवाल,समीर शेख, भागीनाथ मोरे,योगेश देवबोने, संदीप मुराडे तसेच छत्रपती शिवाजी कृषी तंत्र विज्ञालय लासूर कॅम्प महाविदयालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले.

# नेते जरी दुसऱ्या पक्षात गेले तरी कार्यकर्ते अन जनता राष्ट्रवादीच्या पाठीशी : पंकज ठोंबरे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा नव संजीवनी देण्यासाठी तरुणांना व जेष्ठ कार्यकर्त्यांना एकत्र करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस वैजापूर तर्फे संवाद दौऱ्याचे आयोजन केले आहे. या काळात पक्षातील नव्या जुन्या कार्यकर्त्याना सोबत घेऊन समन्वय साधत येणाऱ्या काळात नवी मांडणी करत उभारी घ्यायची आहे, असे वक्तव्य माजी जिल्हा परिषद सदस्य पंकज पाटील ठोंबरे यांनी राष्ट्रवादी संवाद दौऱ्यात भादली येथे बोलतानी केले. याप्रसंगी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष प्रतापराव निंबाळकर, विधानसभा अध्यक्ष दत्तू पाटील त्रिभुवन,माजी जि.प.सदस्य सुरज नाना पवार, बाळासाहेब आबा भोसले, माजी सभापती बाळासाहेब शेळके, ज्ञानेश्वर घोडके, युवक अध्यक्ष आनंद निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. यापुढे बोलतानी ठोंबरे म्हणाले की, वैजापूर विधानसभा मतदारसंघ हा देशाचे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचाराला मानणारा तालुका



आहे, त्यामुळे तालुक्यातील नेते जरी दुसऱ्या पक्षात गेले असले तरी कार्यकर्ते व जनता आजही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोबत आहे. भविष्यात या मतदारसंघातील सर्वसामान्याचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. यापूर्वी वाघला, भटाणा, साकेगाव, पोखरी, पिंपळगाव, मनेगाव, हिंगणे कन्नड, वळण, बल्हेगाव, जिरी मनोली ,बिरोळा, कविटखेडा, शिवराई, गोळवाडी, करंजगाव, हडपिंपळगाव, लासूरगाव, शहजातपूर, खिर्डी, जळगाव,पालखेड, पराळा, पाराळा, भादली, तलवडा, लोणी खु., वाकला, हिलालपूर या गावात दौरा झाला, तेथील मिळालेला प्रतिसाद हा खूप चांगला. ह्या दौऱ्याच्या माध्यमातुन नव्यान मांडणी करत असल्याचे आश्वासक वक्तव्य त्यांनी केले. यावेळी उपसरपंच मीनानाथ गजानन सोणवने, नवनाथ सोनाजी चव्हाण, प्रविण नानासाहेब सुर्यवंशी, बाबासाहेब गिरी, नवनाथ सोनाजी चव्हाण, मच्छिंद्र किसन सोणवने, राजाराम भाऊ भोसले, योगेश मिनिनाथ सोणवने, वैभव रामहरी सोणवने, गणेश आण्णासाहेब सोणवने, ज्ञानेश्वर दादासाहेब सोणवने, मुकेश भाऊ चित्ते, विकास भाऊ भोसले, राकेश सुर्यभान सोणवने व ग्रामस्थ उपस्थित होते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी मोबाईल टाळत मैदानी खेळाकडे लक्ष केंद्रित करावे : काजी शम्सुद्दिन



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील कुंजखेड़ा येथील विद्यालयात क्रीड़ा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाची सुरवात मुक्तदिर मुफ्ती मुकरम मौलाना, परतूरचे महमूद यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव मौलाना फारुक वस्तानवी यांनी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन करताना त्यांच्या शालेय जीवनातील आठवणी सांगितल्याचे त्याचबरोबर आजच्या विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये असलेले विविध प्रकारचे गेम न खेळता त्यांनी शालेय जीवनात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेताना मैदानवर विविध मैदानी खेळ खेळावे आणि खेळ खेळून नेहमी निरोगी राहा, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. खेळ खेळायलाच पाहिजे. हे खेळ बैठे नसून मैदानी खेळ असावे म्हणजेच विद्यार्थ्यांची शारीरिक हालचाल होत राहते व त्याच्या स्नायूना व हाडांना पोषण मिळते. मैदानी खेळ मग ते कोणते ही असो. परंतु विद्यार्थी दशेत खेळलेच गेले पाहिजेत, असे शमशुद्दीन यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्यध्यापक शरीफ बेग, जहीर पटेल, आताऊल्ला खान, मोबीन पटेल, साजिद सय्यद, श्रीमती सहेर मौलाना इब्राहिम त्यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले, कन्नड तालुक्यातील कुंजखेडा येथील अली अलाना उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजीत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे मंगळवारी (दि. १०) मान्यवरांच्या हस्ते थाटात उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून शाळेचे मुख्याध्यापक शरीफ बेग यांनी शालेय क्रीडा क्षेत्राचा आढावा सादर केला. यावेळी संस्थेचे सचिव मौलाना फारुक वस्तानवी, हाजी शब्बीर, आडुळ मदरसाचे काजी शमशुद्दीन, कुंजखेडा येथील अली अलाना उर्दू विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उदघाटनानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवर कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुणे काजी शमशुद्दीन विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन करताना म्हणाली की, विद्यार्थी जीवनात खेळाला फार मोलाचे महत्व आहे. खेळामुळे मन प्रसन्न राहते, त्या ऊर्जेला सतत जागृत ठेवण्यासाठी वाढत्या वयात प्रत्येक विद्यार्थ्याला काही ना काही मैदानी खेळ खेळने गरजेचेच आहे. यामुळे येणारी रोगराईपासून लढन्यास शहरात कार्यक्षमा अधिक असते व आजार पडण्याचे प्रमाण कमी होते, यामुळे विद्यार्थनसोबत नागरिकांनि ही मैदानी खेळ खेलावे व व्यायाम करण्यास भर द्यावे अशी माहिती देण्यात आली आहे.




# राज्य उत्पादक शुल्क विभाग फुलंब्री तालुक्यात मेहरबान

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तीन दिवसा पूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाने फुलंब्री तालुक्यात वानेगाव फाट्यावर मराठा बियरबार यावर तीन दिवसापूर्वी विभागाने कारवाई केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी आमच्या प्रतिनिधीने स्त्रिक ऑपरेशन करत दुसऱ्या दिवशी सकाळी 8:30 वाजता भेट दिली असता सदरील बार सदरील देशी ग्राहकांना पुरवली जात असून बार शासनाची पायपालली करीत करीत सकाळी ते संध्याकाळपर्यंत हे बार सेरास पर्यंत माध्यशोकीनास पुरवली जाते उत्पादक शुल्क विभागाने थातुरमातूर कारवाई शासनाच्या डोळ्यात धूळ फेक करत विभागाच्या अधिकारी या कारवाईत तडजोड केल्याची चर्चा परिसरात होत आहे.



# लासूर येथे राजमाता जिजाऊंना शिवप्रेमींकडून अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकात आज स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ जयंतीनिम्मित शिवप्रेमीकडून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच मीनाताई संजय पांडव व ग्रामपंचायत सदस्य शिलाताई भगवान गाढे यांच्या शुभहस्ते सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. तदनंतर राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार, श्रीफळ अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी विविध राजकीय सामाजिक पदाधिकारी यांनीही आईसाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एन-2 रामनगर येथील ज्ञानसागर वाचनालयात आज स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ जयंतीनिम्मित शिवप्रेमींकडून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेस पक्षाचे शहर सरचिटणीस सुभाष पाटील पांडभरे, कॉ. भास्कर लहाने, शिवाजी काळे, अतिश गवळे, एकनाथ चातुर, लक्ष्मीकांत दाते, कल्याण लिपणे, अतुल खंडगावकर, अंकुश सोळुंके, संतोष साळुंके, अनिल मोरे आदी.



आधुनिक केसरी न्यूज

कन्नड तालुका पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित अध्यक्ष रविंद्र अजमेरा, उपाध्यक्ष सहयोग जावळे, सचिव संतोष निकम यांची निवड झाल्याबद्दल उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार संजय वारकड यांच्या हस्ते तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, नायब तहसीलदार हारुण शेख, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुळे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

## आधुनिक सेंद्रिय शेती नव्या काळाची गरज : महंत रामगिरी महाराज

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** देशात कृषी क्षेत्रात स्वयंपूर्णता यावी म्हणून कृषी प्रदर्शनीचे अनन्यसाधारण महत्त्व ओळखून कृषी प्रदर्शनाचे आयोजन आवश्यक आहे. शेतकरी हा मुळातच कार्यप्रवण असल्यामुळे त्यांना तंत्रज्ञानाबद्दल अती उत्सुकता असते. नेमकी ही बाब हेरून वाल्मीक शिरसाठ यांनी या कृषी प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उपलब्ध करून ही अभिनंदनीय बाब आहे. कृषी प्रदर्शनीच्या आयोजनाचा हा उपक्रम अतिशय स्तूत्य असून,शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता फायद्याचे ठरणार असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले कृषी नगरी नगरपरिषद क्रीडा संकुल लासुर रोड गंगापूर समोर ११, ते १३ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय भव्य शेतकरी वारकरी सत्संग मेळावा कार्यक्रमाचे उद्घाटन महंत रामगिरी महाराज व महाराज राऊत यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आयोजक वाल्मीक शिरसाट, डॉ. आबासाहेब शिरसाट,अविनाश पाटील, संजय जाधव, हरिभाऊ डव्हाण,लक्ष्मण सिंग राजपूत, चंद्रशेखर पाटील, बाबसाहेब गायके, सोपान देशमुख, विजय पांनकडे, साळुंखे, अजित पाटील, राजू मोरे, श्रीलाल गायकवाड, उत्तम गुडेकर, शेषराव साळुंखे, कांता टेमकर सह इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाले. कृषी प्रदर्शन यशस्वीतेसाठी रनजीत चव्हाण, बलराज देशमुख, श्रीकांत कुमावत,संतोष खाडे, नवनाथ कानडे, प्रदीप नरोडे, गणेश चव्हाण मनीष पाटील, प्रमोद महाजन,करण खोमणे, जीवन राजपूत, संदीप राजपूत, सागर बनसोड, हरी शिरसाट, समीर शेख सह इत्यादी परिश्रम घेत आहेत.

## सावळदबारा जि.प. शाळेत राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दिनांक १२ जानेवारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता राष्ट्रमाता मॉसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद (राष्ट्रीय युग पुरुष) यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली सर्वप्रथम आदरणीय मॉसाहेब राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन एम.डी. सोनवणे मुख्याध्यापक यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कशाप्रकारे राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून चांगले शिक्षण घ्यावे आपल्या परिवाराचे व भविष्य उज्वल करावे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक एम.डी.सोनवणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले. यावेळेस सौ. स्वातीताई भाऊराव पाटील सरपंच, मो. आरिफ मो.लुखमान उपसरपंच, शाळेय समितीचे अध्यक्ष सुपडा तडवी, शिक्षक भागवत गायकवाड, सतीश ढोणे, गवई सर, निता हिरास मॅडम, ग्रामपंचायत कर्मचारी आनिल राजपूत, अमोल राऊळकर, सुभाष मानकर, संजय नप्ते व शाळेतील सर्व शिक्षकबंधु, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याबद्दल सविस्तर माहिती सामाजिक कार्यकर्ते प्रा.जीवन कोलते यांनी बोलताना दिली.



## राष्ट्रमाता जिजाऊ-स्वामी विवेकानंद नित्य स्मरणात ठेवा : प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये



आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै.रमेश वरपूडकर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये आज 12 जानेवारी रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ मॉंसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्यकर्तृत्वाचा संक्षिप्त आढावा घेऊन युवकांना माता, माती आणि मातृभूमी याचा नेहमी अभिमान बाळगावा, आपल्या तारुण्याचा आणि आणि आपल्यातील सृजक शक्तीचा योग्य विनियोग करून युवकांनी मोबाईलवर गेम खेळण्यापेक्षा मैदानावर उतरून खेळ खेळावेत, मन मस्तक बलदंड करावे, शक्तिशाली शरीर आणि शक्तिशाली मन हेच देश, गाव आणि घराघराला तारुण नेणारे ठरणार आहे. हा आदर्श आपण सर्वांनी राष्ट्रमाता जिजाऊ आऊसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रातून घ्यायला हवा असे प्रतिपादन डॉ.जायभाये यांनी यावेळी केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव मा.श्री रामेश्वर कदम व प्र.प्राचार्य डॉ.बालासाहेब काळे यांच्या हस्ते प्रतिमपूजन करण्यात आले व लगेच कु.मेघा कुरूडे व कु.ममता कुरूडे यांनी बनवलेल्या भित्तिपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक जिजाऊ वंदना घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शेख शकीला, महाविद्यालयातील संपूर्ण कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सखाराम कदम यांनी तर आभार प्रा.संतोष वडकर यांनी मानले.

# माणसाच्या जगण्याला सिनेमामुळे समृद्धी : अशोक राणे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सिनेमा असो की अन्य कला जगात कुठलीही गोष्ट वाईट नाही. ती गोष्ट आपण कशी वापरतो यावर ते अवलंबून असते. आपल्याला डोळ्यांनी दिसणारी गोष्ट पाहण्याची एक प्रक्रिया असते. आपण चांगलं साहित्य वाचावे, दर्जेदार चांगले संगीत ऐकावे आणि चांगले सिनेमे पाहावेत. कारण सिनेमामुळे माणसाचे जगणे समृद्ध होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट समीक्षक अशोक राणे यांनी केले. औरंगाबाद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवानिमित्ताने डॉ बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठात मराठी विभागाद्वारे आयोजित चित्रपट रसग्रहण कार्यशाळेत बोलत होते. याप्रसंगी



मंचावर दिग्दर्शक शिव कदम, अभिनेते किशोर कदम, सुहास तेंडुलकर, प्रवीण डाळिंबकर, डॉ. आनंद निकाळजे, विभागप्रमुख दासू वैद्य व समन्वयक डॉ कैलास अंभुरे उपस्थित होते.

पुढे अशोक राणे म्हणाले, एखादा चित्रपट महोत्सव म्हणजे खूप दर्जेदार सिनेमा असतात अशी आपली समजूत असते. आपली रडगाणी गाणारी माणसेही त्यात असतात. चित्रपटात जे दाखवले जाते ते जीवनात घडत नाही. चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नाही, परंतु व्यावसायिक दृष्टिकोनामुळे चित्रपटात मनोरंजन करताना भान सुटलेले दिसते. सिनेमा अंधाऱ्या पोकळीत बघायची गोष्ट आहे ती मोबाईलवर किंवा ओटीपी प्लॅटफॉर्मवर नाही. असेही ते म्हणाले.

दिग्दर्शक शिव कदम म्हणाले की, सिनेमा हा कमोडिटी मार्केटचे एक साधन आहे. जो सर्वत्र दाखवला जातो आणि पाहिला जातो केवळ तोच सिनेमा नाही. जो सिनेमा रंजनाच्या दृष्टीने पाहिला जातो त्यामुळे प्रेक्षकांची टेस्ट टेस्ट बिघडली आहे. साहित्य जसे चांगले काम करते तेच सिनेमाही करतो, पण तो सिनेमा आपल्यापर्यंत पोहोचत नाही यासाठी चित्रपट महोत्सव असतात. तर अभिनेते किशोर कदम म्हणाले, सिनेमा जगणं आहे. दुःख आहे. स्वप्न आहे आणि आनंद आहे. ती एक पॅशन आहे. ज्याप्रमाणे कथा, कादंबरी, कविता जीवन समृद्ध करतात तसेच सिनेमाचे हे आहे. सिनेमाने प्रेक्षकांच्या जाणिवा विकसित होतात. असेही ते म्हणाले. याप्रसंगी त्यांनी 'तुझ्या मिठीत ऊब शोधणं नव्हं बरं' ही कविता सादर केली. या प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा दासू वैद्य यांनी केले. तर डॉ. कैलास अंभुरे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. रामेश्वर वाकणकर, डॉ. विलास गायकवाड, डॉ. दैवत सावंत, गणेश घुले, रामप्रसाद वाव्हळ, कुलदीप चव्हाण, पल्लवी जमधडे, शालिनी साळवे आदींनी सहकार्य केले.



## राजमाता जिजाऊ यांना वंदन करून प्लॉगिंग रेसची सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिका यांच्या वतीने वसुंधरा व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्ताने यांना वंदन करून प्लॉगिंग रेसची सुरुवात करण्यात आली. या ठिकाणी शेकडोच्या संख्येने धुळेकर जनतेने सहभाग घेतला.

पहिल्यांदा यरिके या नावाच्या व्यक्तीने नाही याची सुरुवात केली आणि आपल्या भारतामध्ये रिपू दमन नावाच्या व्यक्तीने नवी दिल्ली येथे 2017 रोजी सुरुवात केली जॉगिंग करता करता कचरा कसा उचलावा व पर्यावरण आणि आरोग्य यात मोठा फायदा होईल असा संदेश संपूर्ण भारताला दिला. सफाई कामगारांचा आदर करावा आपण कचरा टाकतो आणि ते आनंदाने सफाई करत असतात त्यामुळे त्याचा आदर केला पाहिजे. २०१४ पासून भारताचे पंतप्रधान मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान सुरुवात केली तेव्हापासून आतापर्यंत विविध उपक्रम राबवण्यात आले. धुळे जिल्ह्यात या कार्यक्रमात मोठा प्रतिसाद देण्यात आला या ठिकाणी जिल्हाधिकारी जलद शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ शहर ठेवण्याकरिता सर्वांच्या उपस्थितीत शपथविधी घेण्यात आले.

महानगरपालिका आयुक्त टेकाळे, धुळे जिल्हाधिकारी जलद शर्मा, अप्पर पोलीस अधीक्षक काळे सर, सर्व पोलीस कर्मचारी, सर्व स्टाफ नर्स, सर्व पालिका कर्मचारी आणि इतर संघटना या सर्वांनी चांगला प्रतिसाद देऊन उपस्थिती नोंदवली.

## धम्मपरिषदेनिमित्त भीमगीत स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भारतीय बौद्ध महासभा शाखा धावरी बूर्द्रूकआणि बोरगाव (ता. भोकर) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी ता.(पाच) फेब्रुवारी रोजी सातव्या बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेआहे. यानिमित्ताने भीमगीत गायन स्पर्धा घेण्यात येणार आहे. गायक कलावंतांनी सहभाग घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. भोकर तामसा रस्त्यावर असलेल्या धावरी लगतच्या सम्राट अशोक महाबूध्दविहार परिसरात प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही बौध्दधम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी व्याख्यान, ध्वजवंदन, धम्मदेशना होणार असून रात्रीला जाहिर सभेनंतर लगेच सांस्कृतिक कार्यक्रमात भीमगीत गायन स्पर्धा घेण्यात येणार आहे. सहभागी स्पर्धकांनी समितीच्या वतीने दिलेल्या नियमाचे काटेकोर पालन करने बंधनकारक आहे. नियम व अटी पुढील प्रमाणे १) स्पर्धेकानी बूध्द, फुले, शाहू, आंबेडकर गीत सादर करावे, २) गीत गायनासाठी केवळ चार मिनीटाचा कालावधी राहणार आहे. ३) गीतगायनासाठी लागणारे साहित्य व वादक कलाकाराची व्यवस्था समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त आपण आलेले साहित्य वापरण्यास परवानगी आहे.४) प्रवेश शूल्क( दोनसे रूपये) ठेवण्यात आली आहे. ५) विजयी स्पर्धकांना प्रथम पारितोषिक (पाच हजार रुपये), व्दितीय साठी (तीन हजार रुपये), तृतीयसाठी(दोन हजार रुपये),व प्रमाणपत्र असे स्वरूप आहे. ६)सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.७) स्पर्धेचा अंतिम निर्णय समितीचा राहिलं. ईछूकानी त्वरीत आपली नाव नोंदणी शनिवारी ता (चार) फेब्रुवारी पर्यंत पूढिल ठिकाणी करून घ्यावी, प्रज्ञा इलेक्ट्रॉनिक (९९२११००८३२) बाबूराव पाटील सकाळ बातमीदार, भोकर (९४०५३७७६७५), क्लासिक हेअर स्टाइल (९१५८१३४०६६), प्रांजल मल्टी सर्व्हिस (९२८४६०३८३४) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन बौध्द धम्म परिषद समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संदीप मानकर यांना राज्यस्तरीय 'महात्मा फुले समता पुरस्कार' जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** आपल्या कर्तबगार आणि उल्लेखनीय लेखणीने



सामाजिक न्यायासाठी शासनाच्या आणि प्रशासनाच्या विरोधात आवाज उठवून अनेक सामाजिक प्रश्नांना आपल्या आदर्श आणि शोध पत्रकारितेतून उचित न्याय देणारे सिल्लोड तालुक्यातील अनाड येथील पत्रकार संदीप दादाराव मानकर यांना उत्कृष्ट पत्रकारितेच्या अनुषंगाने समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांच्या वतीने दिला जाणारा सन-2022 चा राज्यस्तरीय "महात्मा फुले समता गौरव पुरस्कार" जाहीर झाला असून लवकरच हा पुरस्कार वितरित होणार असल्याची माहिती अध्यक्ष तथा संपादक दशरथ सुरडकर, उपसंपादिका जयश्री सोनवणे, कार्यकारी संपादक प्रविण तायडे व पत्रकार संजय दांडगे यांनी मानकर यांना अभिनंदन पत्राद्वारे कळविली आहे. संदीप मानकर हे एक उत्कृष्ट पत्रकार असून राज्याचे माजी गृहराज्यमंत्री रमेश दादा बागवे यांच्या मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी सामाजिक संघटनेचे ते औरंगाबाद जिल्हाध्यक्ष देखील आहेत. सामाजिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने, रास्ता-रोको, उपोषणे व लढे उभारले आहेत त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जात असल्याचा अभिमान आयोजकांनी व्यक्त केला. तर या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक, कला व क्रीडा क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.



## शिरपूर मनपा क्षेत्रातील नागरिकांनी आयुष्मान भारत योजनेचा लाभ घ्यावा : गणेश सावळे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि राज्य शासनाच्या महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेचा अंतर्भाव करून आयुष्मान भारत योजना राबविली जात असून या योजनेअंतर्गत पाच लाखापर्यंत आरोग्य विमा कवच पात्र लाभार्थी नागरिकांना देण्यात येत आहे. शिरपूर वरवाडे नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन शिरपूर वरवाडे नगरपरिषदचे नगरसेवक गणेशभाऊ सावळे यांनी केले आहे. या आरोग्य विम्याच्या माध्यामातुन खासगी व सरकारी रूग्णालयांच्या माध्यमातून उपचार व शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. या योजनेअंतर्गत कर्करोग, हृदय रोग शस्त्रक्रिया, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू शस्त्रक्रिया, मूत्रविकार व त्यावरील शस्त्रक्रिया इत्यादी आजारांचा समावेश आहे.

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना -२०११ यादीनुसार लाभार्थी नागरिकांची निवड करण्यात आली आहे. या यादीनुसार नगरपालिका क्षेत्रात एकूण .......लाभार्थी कुटूंबाचा समावेश असून ...... नागरिक या योजनेचे पात्र लाभार्थी आहेत. आतापर्यंत नगरसेवक गणेश साळवे यांनी प्रत्यक्ष योजने बाबत जनजागृती करूनआपल्या वार्डत फिरुन आवश्यक ती कागदपत्रे तयार करुण प्रभागातील नागरिकांना या योजनेच्या लाभ मिळवून दिला. आतापर्यंत 2589 आयुष्मान योजनेची बायोमेट्रिक पद्धतीने नोंदणी प्रभागात केली आहे. शिरपूर शहरात सर्वाधिक जास्त कार्ड गणेश भाऊ सावळे यांच्या प्रभागात झाले आहे. आपल्या प्रभागातील सर्वाधिक नागरिकांना या योजनेचा लाभ मिळवून दिल्याबद्दल माजी मंत्री आमदार मा.अमरीश भाई पटेल, आमदार मा. काशीराम दादा पावरा,नगराध्यक्षा जयश्री बेन पटेल, उपनगराध्यक्ष भूपेश भाई पटेल यांनी नगरसेवक गणेश भाऊ सावळे यांच्या कामाचे कौतुक केले.. सदर कार्यक्रम प्रसंगी आमदार काशीराम दादा पावरा ,के डी पाटील सर ,भटू आप्पा सोनवणे, सभापती कृ.उ. बाजार समिती शिरपूर श्री नरेंद्र सिंह सिसोदिया, सुरेश भाऊ अहिरे, खंडू भाऊ महिरे, भैया भाऊ थोरात, युवराज पारवा, मच्छिंद्र थोरात, बाबू दादा खैरणार, गौतम खैरनार, दिनेश सावळे, , सुनील अण्णा शिरसाट, विक्की भाऊ ढिवरे स्वयं प्रेरणेने उपस्थित होते.या लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड असणे आवश्यक आहे. धुळे जिल्हा क्षेत्रातील मान्यताप्राप्त रूग्णालय या माध्यमातुन आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ५लाख रूपयांचे आरोग्य कवच उपलब्ध होणार असल्याने शिरपूर नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी या योजनेचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेण्याचे आवाहन नगरसेवक गणेश भाऊ सावळे यांनी केले आहे.




नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर घर संसार



सुमित 7620111118 | राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142, 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308, 9657398232
घाऊक चौकशी 7620111118, 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# भ्रष्टाचाराच्या आशीर्वादाने कोसळली संरक्षण भिंत

## सेनेचे प्रवीण साळवे यांनी आयुक्तांकडे केली कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** प्रभाग 18 मधील मिल परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या ( चक्करवडी ) टाकीची संरक्षण भिंत बांधुन 20 ते 25 दिवस झाले असून एक छोटासा पाण्याचा वाल लीक झाल्यामुळे अचानक भिंत कोसळली सदैवाने यात कुठलीही जीवित हानी झाली नाही परंतु जनतेच्या पैशांची अशाप्रकारे उधळण होत आहे व टक्केवारीच्या नादात भ्रष्टाचार होत आहे असे सेनेचे प्रवीण साळवे यांनी निवेदनात म्हटले. ह्या निकृष्ट बांधकामाची चौकशी करून ठेकेदारास काळ्या यादीत टाका अशी ही मागणी करण्यात आली धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्र . 18 मधील मिल परिसर (चक्करबर्डी) परिसराला पाणी





पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीलगत संरक्षण भिंतीचे काम गेल्या 20 ते 25 दिवसांपूर्वी करण्यात आले होते . तरी जागेवर पाहणी केली असता व स्थानिक लोकांच्या तक्रारीवरून घटणास्थळी गेलो , सुमारे 30 ते 35 लाख रूपये खर्चुन बांधण्यात आलेली संरक्षण भिंत अक्षरशा कोसडलेली दिसली . सुदैवाने कुठलीही जिवित हानी झाली नाही . पण हा पुळेकर जनतेच्या पैशांची लुट सरेआम होतांना दिसत आहे . संपूर्ण शहरात भ्रष्टाचाराचा मोठा डोंगर भाजपाच्या माध्यमातून उभा जनतेस दिसत आहे . साळवे यांची मागणी अशी आहे की सदरील निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी होऊन ठेकेदार व संस्थेला हे काम देण्यात आलेले आहे त्या ठेकेदाराला व संस्थेला काळ्या यादीत टाकण्यात यावे तसेच ज्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हे निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आले आहे अशा अधिकाऱ्यांची चौकशी होऊन त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी , जेणेकरून अशा निकृष्ट दर्जाच्या कामामुळे धुळे मनपाची बदनामी होणार नाही व जी धुळेकर जनता आपल्या कष्टाचा पैसा धुळे मनपाला टॅक्स स्वरूपात देते याची लुट होणार नाही याची दक्षता घेऊन आपण या प्रकरणात स्वतः जातीने लक्ष घालावे असे आयुक्त टेकाळे यांच्या समोर बसून विषय मांडला अन्यथा कारवाई न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडण्यात येईल असे आव्हान केले.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व नवभारताच्या नवनिर्मितीचा नवा अविष्कार संपूर्ण जगापुढे अभिमानाने मांडणारे स्वामी विवेकानंद या दोघी महान व्यक्तींच्या जयंती निमित्ताने कमलाबाई कन्या हायस्कूल व चंदादेवी सुभाषचंद्र रुणवाल शैक्षणिक संकुल येथे फोटोला पुष्पहार लावून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मुख्याध्यापिका सौ मनीषा जोशी, उप मुख्याध्यापिका मनीषा ठाकरे, पर्यवेक्षिका सौ छाया नाईक, जयश्री शिरोळे, श्रीमती वंदना खैरनार आदी उपस्थित होते.



# लम्पीच्या मदतीसाठी पशुपालक प्रतीक्षेत

आधुनिक केसरी न्यूज

**अतुल वेताळ**

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातीलओल्या दुष्काळाने त्रस्त शेतकरी पशूंना होणाऱ्या लम्पी चर्मरोगाने देखील हवालदिल झाला असून तालुक्यात जवळपास ५८पशुधन या रोगाने दगावले असले तरी पशुधनांची नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. मृत पशुधन पडताळणी पूर्ण होऊंनही शेतकऱ्यांवर भरपाईसाठी वाट पाहणेच नशिबी आले आहे.

मागील काही महिन्यात पशुधनावर आलेल्या लम्पी रोगाने तालुक्यातील ५८ जनावरे दगावली आहेत. लम्पी आजाराने दगावलेल्या जनावरांच्या पालकांना ताबडतोब आर्थिक मदत देण्याची घोषणा राज्य सरकारने केली खरी, प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना ही मदत मिळावी, यासाठी पायपीट करावी लागत आहे. अनेक जिल्ह्यांना ओल्या दुष्काळाने घेरलेले असताना घरातले पशुधनही लम्पीने दगावल्याने शेतकऱ्यांना दुहेरी फटका बसला आहे. तालुक्यातील ५८ पशुधन लम्पी चर्मरोगाने दगावले आहेत.

तालुक्यातील सातसे चोवीस जनावरे लम्पी आजारातून बरी झाली तर सध्या साठ जनावरे लम्पी ने बाधीत आहे. जनावरांना जाहीर केलेली मदत दुभती गाय ३० हजार रुपये,भाकड गाय आणि बैल २५ हजार,वासरू १६ हजार लम्पी पासून पशुधनाला वाचवण्यासाठी आणि त्यांच्या उपचारावर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा नाही. लम्पी आजाराने दगावलेल्या पशुधनाच्या पालकांना तातडीने त्यांच्या खात्यात पैसे जमा करावेत. अशी मागणी पशु पालकांनी केली आहे.

> तालुक्यात आता पर्यंत ५८ जनावरे लम्पि ने दगावले असून मदती साठी प्रस्ताव पुढे पाठवले आहे . –**विष्णु खोडवे, पशुधन विस्तार अधिकारी**
>
> दोन महिने होऊन गेले लम्पी आजाराने माझी गाय दगावली अजुन पंर्यत मला शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाही .
>
> **– पशुपालक शेतकरी, सुलतानपूर**

# लासूर स्टेशन मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी मकसूद शेख

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासुर स्टेशन येथील मराठी पत्रकार संघटनेच्या अध्यक्षपदी दिव्य मराठीचे मकसूद शेख तर उपाध्यक्षपदी रामेश्वर केरे व सचिवपदी अप्पासाहेब वंजारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बुधवारी दि.११ रोजी 3 वाजता मावलते अध्यक्ष महेमुदभाई भारतवाला यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या संलग्न असलेल्या लासुर स्टेशन मराठी पत्रकार संघटनेच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी मकसूद शेख,उपाध्यक्षपदी रामेश्वर केरे,सचिव म्हणून अप्पासाहेब वंजारे तर कार्याद्यक्षपदी सुनील पाटील झिजूर्डे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी कोषाध्यक्ष महेमुदभाई भारतवाला,



सल्लागार दै. शिवनातीरचे नवलचंद कोठारी व मराठी पत्रकार संघाचे दै लोकमतचे रामेश्वर श्रीखंडे,दै पुढारीचे पोपट ठोकळ, दै. देशोन्नतीचे खलील शहा, दै. आत्ताच एक्सप्रेस फिरोज मंन्सुरी, दै. केसरी व मराठा तेजचे गुलाब वाघ, दै. आनंद नगरीचे सलीम सय्यद, दै. पुण्य नगरीचे बाळासाहेब कदम, दै. मराठवाडा साथीचे धरमसिंग बिमरोट, दै. लोकप्रश्नचे मनिष मुथा, दै. पब्लिकराजच्या सपना बनकर, सी न्यूजचे सुनिल झिंजुर्डे,सुभाष थोरात, मिलिंद मकासरे,युनुस पठाण, महेंद्र सोनवणे, सुनिल लाठे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.





